# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २१९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.३० ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## नेपाळमधील बचावकार्याबद्दल शशी थरूर यांनी मानले पंतप्रधान मोदींचे आभार, लष्कर तैनात करण्याची केली मागणी

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आहे. यापूर्वीही त्यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक करत काँग्रेसला तोंडघशी पाडले होते. यावेळी त्यांनी नेपाळमधील भीषण पूरपरिस्थितीनंतर भारताने ज्याप्रकारे तात्काळ हस्तक्षेप केला आणि या संकट निवारणासाठी जी भूमिका घेतली त्याबद्दल सरकारचे कौतुक केले.

एका बाजूला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून नेपाळला मानवतावादी मदत करण्याबाबत सुचवले होते. तिथे अडकलेल्या भारतीयांना तात्काळ सुरक्षितरित्या परत आणण्यासंदर्भात बचाव कार्याला वेग देण्याची मागणी त्यांनी केली होती. तर शशी थरूर यांनी केंद्रीय परराष्ट्र मंत्री शशी थरूर यांना पत्र लिहून भारताने केलेल्या बचाव कार्याचे कौतुक केले आहे.

शशी थरूर यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले की, नेपाळमधील भीषण पुरानंतर भारताचा प्रतिसाद जलद आणि भरीव होता. पंतप्रधान मोदींनी नेपाळशी लवकर संपर्क साधत मदतीचा हात पुढे केला. मदत साहित्याच्या चार खेपा, डॉक्टर, पॅरामेडिक्स आणि टनेल रेस्क्यू तज्ज्ञांचे अकरा सदस्यी पथक, तसेच नियंत्रण कक्ष आणि दूतावासाच्या हेल्पलाईनमुळे मोठी मदत झाली. तसेच बचावकार्यात मदत करणारे भारतीय राजदूत श्रीवास्तव आणि त्यांच्या टीमचीही त्यांनी प्रशंसा केली.

# हे शेवटचं आंदोलन, मागणीत एकही माघार नाही

## अंतरवालीतून मनोज जरांगे यांचा पुन्हा एल्गार

जालना दि.२९ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्र, जात पडताळणी समिती या मुद्द्यांवरुन राज्य सरकारला इशारा दिल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्राच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण चांगलंच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठीच्या वंशावळ जुळवणी समितीला आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, जरांगे पाटलांनी उपोषणाला सुरुवात केली असून आज पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येनं मराठा बांधव अंतरवाली सराटीत दाखल झाल्याचं दिसून आलं. या बाधवांना जरांगे पाटलांनी संबोधित करताना, लवकरच मुंबई गाठण्याची तारीख जाहीर करू असे म्हटले.

आपल्याला महाराष्ट्रातील, मुंबईतील मराठ्यांनी नावं नाही ठेवले पाहिजे, हेही संस्कार जपले पाहिजेत. यावेळी, विजयापासून लांब जाऊ द्यायचं नाही ही जबाबदारी आपली आहे. यंदाचे उग्र आंदोलन सुद्धा मराठ्यांच्या शांततेपणात उग्र वाटले पाहिजे. हे शेवटच आंदोलन, याच्या मागणीत एकही माघार नाही. महाराष्ट्रातील बांधव बोलावून मुंबईची तारीख ठरवणार आहे. तीन दिवसात मराठा मुंबईला नेऊन वापस आणलेला आपल्याला परवडणार नाही. त्यामुळे पक्की तयारी करायची आहे. येत्या १२ तारखेला मुंबईच्या तारखेची घोषणा करू, मुंबईत ५ टप्प्यात आंदोलन होईल अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

मी काय चीज आहे हे अजित दादा, फडणवीस आणि एकनाथ शिंदेंना माहिती आहे, मी साधं रसायन नाही, त्यांच्यात चर्चा होती. त्यामुळे, ही लढाई आपल्याला नियोजनबद्ध करावी लागणार आहे. फडणवीस-शिंदेंच्या डोक्याला मुंग्या आल्या पाहिजेत. सरकारला माज आलाय, आमचे कोणीच काही करू शकत नाही असं त्यांना वाटतंय. पण, मराठ्यापुढे सत्तेच शहाणपण चालत नाही. एकदा प्लॅनिंग झाली तर मुंबईच नाही दिल्ली सुद्धा हलवू शकतो, अशा शब्दात जरांगे पाटलांनी सरकारला इशारा दिला आहे. मला बोलता आले नाही तरी मला वर्षावर घेऊन जा, मी बारका दिसतो पण १०-१२ जण पाडू शकतो. मुंबईला



४०-४५ लाख मोटरसायकल काढायच्या आहेत, मी एकटा ट्रकवर येतो, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

मनोज जरांगे यांनी साठीतील मराठा समाज बांधवांना देखील आवाहन केलंय. म्हातारे माणसं जे ५०-६० च्या आतचे आहेत, त्यांनी मुंबईला चला. तरुण झुंजणार तर मग म्हातारे नोकरी करणार का? पारावर वेळ घालवण्यापेक्षा, समाजासाठी लढा, असे जरांगे पाटील यांनी म्हटले.

पोलिसांनी दिलेल्या प्रतिबंधात्मक नोटिशीवर बोलताना जरांगे म्हणाले, ''वाहतुकीला अडचण होऊ नये म्हणून आम्ही स्वयंसेवक देतोय. यात प्रदूषणाचा उल्लेख असेल, तर गाड्या घेतल्यावर आणि सरकारचे जे काही सुरू आहे त्याने प्रदूषण होत नाही का? शेतकऱ्यांना, गोरगरीब जनतेला आणि लाडक्या बहिणींना पैसे देणार आहात, त्याने प्रदूषण होत नाही का? हे सरकारी प्रदूषण आधी थांबवा.''

कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्रांच्या वैधतेवर बोलताना जरांगे यांनी जात पडताळणी प्रक्रियेवर मोठा आक्षेप घेतला. ''तहसीलदार, एसडीएम किंवा सक्षम अधिकारी सगळे पुरावे तपासूनच कुणबी प्रमाणपत्र देतात, मग पुन्हा जात पडताळणी कशासाठी? देशातील इतर राज्यांमध्ये अशी समिती नाही, मग ती फक्त महाराष्ट्रातच का?''

''जात पडताळणी अधिकारी जाणुनबुजून मराठा मुलांची अडवणूक करतात. पैसे दिले की त्यांचे कीस पडत नाहीत, नाही दिले की कागदपत्रांमध्ये मुद्दाम चुका काढल्या जातात. यामुळे लोकांचे हेलपाटे होतात आणि ॲडमिशन्स कॅन्सल होतात. त्यामुळे इतर राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातील जात पडताळणी समिती कायमची बरखास्त करावी,'' अशी मोठी मागणी त्यांनी केली. या निर्णयामुळे (पान ४ वर)

## नेपाळ महापूर: मृतांची संख्या ६२६ वर! ३२० भारतीय अजूनही बेपत्ता

### कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले ४०० भाविक तिबेटच्या सीमेवर अडकले; परराष्ट्र मंत्रालयाची माहिती



नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुराने मोठ्या प्रमाणावर हाहाकार उडवला आहे. या नैसर्गिक आपत्तीत अडकलेल्या भारतीयांबाबत आता मोठी माहिती समोर आली आहे. नेपाळमधील पूरग्रस्त भागांतून अद्याप ३२० भारतीय नागरिक बेपत्ता असल्याची अधिकृत माहिती भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. याशिवाय भारतीय वंशाचे १०० हून अधिक नागरिक अद्याप संपर्काबाहेर आहेत.

नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी भारत सरकारकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

नेपाळमध्ये सलग तिसऱ्या दिवशीही शोध आणि बचावकार्य सुरू असून, आतापर्यंत मृतांचा एकूण आकडा ६२६ वर पोहोचला आहे. भोटेकोशी नदीच्या पात्रातील पाण्याची पातळी अचानक वाढल्याने पुन्हा एकदा पुराचा धोका निर्माण झाला आहे. या संकटामुळे स्थानिक प्रशासनाची चिंता वाढली असून, सुमारे १,९२४ लोक अद्यापही बेपत्ता आहेत. यामध्ये ५१७ परदेशी पर्यटकांचा समावेश आहे.

नेपाळच्या आठ जिल्ह्यांमधून आतापर्यंत ६२६ मृतदेह हाती लागल्याची माहिती नेपाळच्या पोलिसांनी दिली. नवलपारसी पूर्व जिल्ह्यत १५४ मृतदेह सापडले आहेत. आतापर्यंत सर्वाधिक जीवितहानी चितवन जिल्ह्यत झाल्याचे दिसत असून तेथे २३३ मृतदेह हाती लागली आहेत. अद्याप १,९२४ लोक बेपत्ता आहेत. नेपाळच्या पर्यटन मंडळाने (पान ४ वर)

## शरद पवारांकडून १० प्रवक्त्यांची नवी यादी जाहीर

### जितेंद्र आव्हाडांसह तरुण चेहऱ्यांना संधी, रोहित पवार बैठकीला गैरहजर

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) संघटनात्मक पातळीवर महत्त्वाच्या हालचाली सुरू असून पक्षाकडून नव्या १० प्रवक्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवारी जाहीर करण्यात आलेल्या या यादीत अनुभवी नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह पक्षातील अभ्यासू आणि तरुण चेहऱ्यांना प्रवक्तेपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षाची भूमिका, धोरणे आणि विविध राजकीय मुद्द्यांवर माध्यमांसमोर अधिकृतपणे भूमिका मांडण्याची जबाबदारी आता या प्रवक्त्यांवर असणार आहे.

पक्षाच्या कोअर कमिटीची महत्त्वाची बैठक शनिवारी पार पडली. या बैठकीत पक्ष संघटना मजबूत करण्यासह आगामी काळातील राजकीय रणनीती, विविध संघटनात्मक विषय आणि पक्षाच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे. या बैठकीला पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

पक्षाने जाहीर केलेल्या नव्या (पान ४ वर)

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बिगरमराठा, जातीय आकसापोटी मनोज जरांगेंचे आंदोलन; गुणरत्न सदावर्तेंचा आरोप

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे पाटील यांना अंतरवाली सराटी आणि मुंबईत यापैकी कुठेही आंदोलन करुन देऊ नका. पोलिसांनी मंत्रालयातील कोणाचीही वाट बघू नका. या प्रकरणात कायद्यांना आणि धमक्यांना जास्त गांभीर्याने घ्यावे. मनोज जरांगे यांचे हे आंदोलन विशिष्ट राजकीय कारणासाठी होत आहे. कारण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बिगर मराठा समाजामधील आहेत, असे वक्तव्य ॲडव्होकेट गुणरत्न सदावर्ते यांनी केले. ते शुक्रवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात राजकीय व्यक्ती देखील सक्रिय आहेत. माजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यासहित मराठा समाजातील इतर नेते यामध्ये सक्रिय आहेत. या आंदोलनाला सत्तेतील आणि सत्तेबाहेरील मराठा समाजाचा थेट पाठिंबा आहे. जातीय आकसापोटी देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले जात आहे. मनोज जरांगे हा एक प्यादा आहे. तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सेवक आहे.

जरांगे मुख्यमंत्र्यांच्या घराला टार्गेट करण्याची भाषा करतो तरी एकनाथ शिंदे मूग गिळून गप्प बसले आहेत. फक्त एकनाथ शिंदे नाहीतर सत्तेतील इतर मंत्री विखे-पाटीलही मवाळपणे बोलतात. विखे-पाटील यांनी कधीच मनोज जरांगे पाटील यांचा निषेध केला नाही, असे गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले.

मराठा भावांना मराठा आरक्षण नको, तर ई डब्ल्यूएस आरक्षण हवे असे मला अनेक कॉल्स येत आहेत. पाटील नावाची पदे संविधानामध्ये मला दिसत नाहीत. गावांमध्ये पाटील अस,तो तो बौद्ध किंवा आदिवासी समाजाचा असू शकतो. मनोज जरांगे म्हणतो की मला पाटील म्हणा. मनोज जरांगे पाटील हा पॉलिटिकल एक्सट्रॉर्शन करणारा माणूस आहे. आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला डिस्टर्ब करण्याची भाषा करत आहे. रेल्वेची पटरी उखडून टाकू, विमानतळ (पान ४ वर)

## नाशिकमधील कुंभमेळ्यात २५ हजार कोटींचा भ्रष्टाचार होणार, संजय राऊतांचा गंभीर आरोप

नाशिक दि.२९ (प्रतिनिधी)- नाशिकमधील कुंभमेळ्याच्या तयारीसह शहरातील रस्त्यांची अवस्था आणि कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. नाशिकमध्ये मुख्यमंत्र्यांच्या भाषणाला आणि मेळाव्याला नागरिकांनी बहिष्कार टाकल्याचा दावा करत, ''९९ टक्के खुर्च्या रिकाम्या होत्या,'' असा आरोप राऊत यांनी पत्रकार परिषदेत केला.

नाशिकमधील भ्रष्टाचारावर भाष्य करताना राऊत म्हणाले, ''नाशिकमधला भ्रष्टाचार हा महाराष्ट्रातील सर्वोच्च भ्रष्टाचार आहे, हे खुद्द मुख्यमंत्र्यांनाही माहीत आहे. कुंभमेळ्याच्या भ्रष्टाचारावर केवळ आम्हीच नाही, तर साधूसंतही टीका करत आहेत. कुंभमेळ्यासाठी जे ४५ हजार कोटींचे बजेट आहे, त्यातील तब्बल २५ हजार कोटी रुपये कुंभमेळा मंत्री आणि त्यांचे अधिकारी उडवणार आहेत, आणि याची सुरुवात आतापासूनच झाली आहे.''

शहरातील खड्ड्यांच्या समस्येवर (पान ४ वर)

## टाकळीवाडी येथे गॅस वाहिनीला गळती, समृद्धी महामार्गावरील वाहतूक वळवली

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- समृद्धी महामार्ग लगत असणाऱ्या टाकळीवाडी ता. गंगापूर येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागली असून खबरदारीचा उपाय म्हणून समृद्धी महामार्गा वरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यानची (२४ किमी अंतर-हडस पिंपळ गाव ते माळीवाडा) वाहतूक धुळे सोलापूर महामार्गावरून वळविण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी कळविले आहे.

आज सायं. ५ वा. सुमारास टाकळी वाडी येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागली. या घटनेची प्रशासनाने तात्काळ दखल घेत, त्वरित उपाययोजना सुरु केल्या. घटनास्थळी तात्काळ गेल कंपनीच्या अधिकाऱ्यांना पाचरण करण्यात आले. तसेच अग्निशमन यंत्रणा सज्ज करण्यात आली.

**वाहतूक वळवली**

तथापी, खबरदारी म्हणून समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यान २४ किमी वरील वाहतूक धुळे सोलापूर महामार्गावरून वळवण्यात आली आहे. मुंबई कडुन जाणारे वाहने हे हडस पिंपळगाव इंटरचेंज वरून उतरून धुळे सोलापूर महामार्गावर जातील व माळीवाडा येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर येतील. नागपूर कडुन येणारी वाहने माळीवाडा इंटर चेंज वरून धुळे सोलापूर महामार्गावर येतील व हडस पिंपळगाव येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर येतील. रहदारी धुळे सोलापूर महामार्ग वरून वळविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी सांगितले.

दरम्यान गेल कंपनी च्या तज्ञानी दोन्हीही बाजू कडील व्हॉलव्ह बंद केले असून पाईप लाईन मधील दाब कमी होत आहे. लवकरच रहदारी सुरळीत होईल यासाठी प्रशासन अथक प्रयत्न करीत असून जिल्हाधिकारी व पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी लक्ष ठेवून आहेत.

अधिक माहिती साठी समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्ष क्रमांक १८०० २३३ २२ ३३ व ८१८१८१८१५५ वर संपर्क साधता येईल, असेही कळविण्यात आले आहे.

## चीनचे राजकीय सल्लागार झाओ जोंगकी यांना पदावरुन हटवले, राष्ट्रपती शी जिनपिंग यांचा तडकाफडकी निर्णय

शांघाय दि.२९ (वृत्तसंस्था)- चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. प्रमुख राजकीय सल्लागार पदावरील जनरल झाओ जोंगकी यांना त्यांच्या पदावरुन हटवण्यात आलं आहे. डोकलाम संघर्ष आणि भारताविरोधात ऑपरेशन गलवानचा आदेश दिल्यानं झाओ जोंगकी यांनी चर्चेत आले होते. गलवान खोऱ्यातील संघर्षवेळी झाओ जोंगकी पीपल्स लिबरेशन आर्मीच्या पश्चिम कमांडचे प्रमुख होते. भारताला धडा शिकवण्यासाठी झाओ जोंगकी यांच्याकडून गलवान ऑपरेशनला मंजुरी देण्यात आली होती. झाओ जोंगकी यांना चायनीज पीपल्स पॉलिटिकल कन्सल्टेटिव्ह कॉन्फरन्सची मेंबरशीपवरुन हटवण्यात आलं आहे. याशिवाय त्यांना इतर दोन पदांवरुन हटवण्यात आलं आहे. शी जिनपिंग यांच्या भ्रष्टाचार विरोधी अभियानादरम्यान शिस्त आणि कायद्याचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

## पुणे मनपाच्या कनिष्ठ अभियंता परीक्षेत हायटेक कॉपी; भरती रद्द करण्याची सुप्रिया सुळेंची मागणी

पुणे दि.२९ (वृत्तसंस्था)- पुणे महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाच्या भरती परीक्षेत कथित गैरप्रकार झाल्याची माहिती समोर आली आहे. या भरती प्रतिक्रियेत ३ उमेदवार संशयित आढळले असून त्यांनी हायटेक पद्धतीने परीक्षेत कॉपी केल्याचं उघड झालं आहे. या प्रकारामुळे या तीनही उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात आली आहे. या उमेदवारांना मदत करणाऱ्या छत्रपती संभाजीनगरमधील परीक्षा केंद्रावरील दोन कर्मचारी आणि तीन उमेदवार अशा पाच जणांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आता महापालिकेने १६९ पदांपैकी १४६ पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती महापालिकेच्या आयुक्तांकडून देण्यात आली आहे. मात्र, या भरती परीक्षेत झालेल्या कथित गैरप्रकारावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ही भरती प्रक्रिया रद्द करुन पुन्हा नव्याने पारदर्शक पद्धतीने भरती प्रक्रिया राबवण्याची मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे. तसेच रोहित पवार यांनी थेट 'मनपा'समोर आंदोलनाला बसण्याचा इशारा दिला आहे.

''पुणे महापालिकेच्या ज्युनिअर इंजिनिअर भरतीचा पेपर फक्त ३ विद्यार्थ्यांना मिळाला (पान ४ वर)

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक निर्णय, उईकेंचे उपोषण मागे घेण्याचे आवाहन

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्री आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी मांडलेले प्रश्न आणि मागण्या मुख्यमंत्र्यांनी मान्य केल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्रातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनांमधून विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्व प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्याचे उईके यांनी सांगितले. तसेच पुणे, नागपूर आणि नाशिक येथे उपोषणाला बसलेल्या विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेऊन आपले दैनंदिन कामकाज आणि अभ्यास सुरू करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

येत्या तीन महिन्यांनंतर विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मागण्यांवर झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी करताना कोणत्या अडचणी निर्माण झाल्या, याचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री पुन्हा विद्यार्थ्यांसोबत चर्चा करणार असल्याचेही उईके यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्यांपैकी अनुसूचित जमातीच्या बिंदूनामावलीतील स्थानाचा प्रश्न महत्त्वाचा होता. २०१७ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीचा बिंदूनामावलीमध्ये दुसरा क्रमांक असावा, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. या संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीला तीन महिन्यांच्या आत शिफारस सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे उईके यांनी स्पष्ट केले.

## सीजेपीचे अध्यक्ष अभिजीत दिपके शाळा प्रश्नी पुन्हा आक्रमक

हिंगोली दि.२९ (प्रतिनिधी)- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्काला केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळणे आवश्यक आहे. मात्र, जिल्हा परिषद शाळांमधील मूलभूत सुविधांची दुरवस्था पाहता ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या गैरसोयी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे गुन्हा असेल, तर एक नाही, शंभर गुन्हे दाखल करा; पण शाळा (पान ४ वर)

## मल्लिकार्जुन खरगेंच्या सभेनंतर 'व्यासपीठ शुद्धीकरणा'वरुन वाद; राहुल गांधी आक्रमक

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज (२९ ऑगस्ट) पत्रकार परिषद घेत विविध मुद्यांवर भाष्य केलं आहे. वेगवेगळ्या मुद्यांवरून राहुल गांधी यांनी भाजपावर जोरदार टीका केली आहे. या पत्रकार परिषदेत बोलताना राहुल गांधी यांनी उत्तराखंडमधील हल्द्वानी येथे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या सभेनंतर करण्यात आलेल्या कथित 'शुद्धीकरण' विधीचा मुद्दा मांडत जोरदार टीका केली आहे.

मल्लिकार्जुन खरगेंची काही दिवसांपूर्वी उत्तराखंडमध्ये एक सभा पार पडली होती. मात्र, त्यांच्या सभेनंतर काही व्यक्तींनी कथित 'व्यासपीठ शुद्धीकरण' केल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला होता. याच मुद्यावरून पावसाळी अधिवेशनातही मोठा गदारोळ झाला होता. यावर मल्लिकार्जुन खरगे यांनी स्वत: केंद्र सरकारला सवाल केले होते. आता या व्यासपीठ शुद्धीकरणाच्या मुद्यांवरून राहुल गांधी हे आक्रमक झाले आहेत.

मल्लिकार्जुन खरगेंच्या सभेनंतर कथित व्यासपीठ शुद्धीकरण केल्याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे, दोषींवर कारवाई झाली पाहिजे आणि मल्लिकार्जुन खरगे यांना न्याय मिळाला पाहिजे, अशी भूमिका राहुल गांधी यांनी मांडली आहे. या पत्रकार परिषदेत राहुल गांधींनी प्रोजेक्टरवर काही व्हिडीओ देखील दाखवले आहेत.

''देशात दोन विचारसरणींमध्ये संघर्ष सुरू आहे. एका बाजूला भारताचं संविधान आहे. आंबेडकर, गांधी, जवाहरलाल नेहरू आणि दुसऱ्या बाजूला भाजपा व आरएसएसची विचारसरणी आहे. सध्या भारतात सुरू असलेलं राजकारण या दोन विचारसरणींमधील आहे. शेकडो वर्षांपासून या देशातील दलितांवर अत्याचार आणि हिंसाचार होत आहे. संविधानाने या गोष्टी बेकायदेशीर ठरवल्या असल्या तरी आजही शाळांमध्ये दलित मुलांना शौचालये साफ करायला लावले जातात किंवा फरशी झाडून-पुसून स्वच्छ करायला लावली जाते. मग याचा भावी पिढीच्या मनावर काय परिणाम होत असेल याचा विचार करा'', असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

# हिंदवी स्वराज्याचे साक्षीदार विश्वव्यापी...!

महाराष्ट्राची अस्मिता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या महाराष्ट्रातील ११ गडकिल्ल्यांचा जागतिक वारसास्थळामध्ये समावेश झाला. छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातली स्थापत्य कला जागतिक स्तरावर पोहोचली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य आणि पराक्रमाचे खऱ्या अर्थाने जिवंत साक्षीदार असणारे हे गडकिल्ले जागतिक स्तरावर पोहोचले आहेत. महाराष्ट्रातील हे गडकिल्ले महाराष्ट्रातील जनतेला माहिती होतेच; परंतु त्याला आता युनेस्कोमध्ये स्थान मिळाल्यामुळे विश्वव्यापी झाले आहेत.

आज या गडकिल्ल्यांवर हजारो पर्यटक येत असतात. मराठा साम्राज्याच्या शौर्याची साक्ष असणारे हे गडकिल्ले एकाचवेळी युनेस्कोच्या नकाशावर यावेत हे खरं तर मराठी मनाला सुखद अशी घटना आहे.

कोकणातील सिंधुदुर्ग, विजयदुर्गाबरोबरच अन्य किल्ल्यांचा समावेश आहे. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी, लोहगड, साल्वेर, सुवर्णदुर्ग, खांदेरी, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग तामिळनाडुतील जींजी या प्रत्येक किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या पाऊलखुणा उमटलेल्या आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक गडकिल्ला छत्रपती शिवरायांच्या व्यवस्थापनाचा स्थापत्य वैशिष्ट्यासह बांधण्यात आला आहे. सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग हे किल्ले तर समुद्रातच उभे आहेत.

विजयदुर्ग किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आरमारी तळ म्हणून ओळखला जायचा. आजवर या गडकिल्यांची बरीच पडझडही झाली. पुरातत्त्व विभागाच्या सुधारणांना फारच मर्यादा होत्या. आता युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळात या गडकिल्ल्यांचा समावेश झाल्याने साहजिकच राज्य आणि केंद्र सरकारकडून देखभाल दुरुस्तीसाठी खर्च केला जाऊ शकतो. जागतिक स्तरांच्या वारसास्थळांची जपणूकही होऊ शकते. महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकारने महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि मराठा साम्राजाचा इतिहास जगासमोर युनेस्कोच्या माध्यमातून केला आहे.

कोकणात गेल्या काही वर्षांत पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत आहेत. कोकणातील निसर्ग, स्वच्छ सुंदर आणि आकर्षण ठरणारे समुद्र किनारे यामुळे साहजिकच पर्यटकांचा ओघ वाढला आहे; परंतु युनेस्कोच्या रेकॉर्डनंतर जागतिक स्तरातील पर्यटकांचा ओघ भविष्यात मोठा वाढणार आहे. मराठा साम्राज्याच्या पराक्रमाचा इतिहास देशपातळीवरही माहीत होता. आता इतिहासाची, पराक्रमाची पानं जागतिक स्तरांवर उलगडली जात आहेत.

एकीकडे मराठ्यांच्या युद्धनीतीवर प्रकाश पडेल. कोकणातील ही वारसास्थळ या पुढच्या काळात केवळ पर्यटन स्थळ असणार नाहीत, तर सर्वांगाने जागतिक स्तरावरचा येणारा पर्यटक त्यांच्या-त्यांच्या दृष्टिकोनातून अभ्यास करत राहिल. यातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, त्यांचा पराक्रम, त्यांच्या शौर्यगाथा नव्याने जगासमोर मांडल्या जातील. त्याचा निश्चितपणे फायदा कोकणातील पर्यटन वाढीला होऊ शकेल. आजवर केवळ इतिहासप्रेमी, इतिहास अभ्यासकच या गडकिल्ल्यांच्या भेटीला जात होते; परंतु यापुढच्या काळात सर्वच पर्यटक या जागतिक वारसास्थळांना भेटी देतील. आता या जागतिक वारसा यादीत जरी भारताचं आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व अधोरेखित झाले असले तरीही भविष्यात या युनेस्कोच्या यादीतील वारसास्थळं त्याच पद्धतीने जपली पाहिजेत.

यापुढे येणाऱ्या पर्यटकांना आणि स्थायिक असणाऱ्या सर्वांनाच स्वत:ला काही शिस्त अंगीकारणे आवश्यक आहे. बऱ्याच पर्यटनस्थळांवर रिकाम्या पाण्याच्या बाटल्या अशाच फेकल्या जातात. समुद्र किनाऱ्यांवर जेव्हा साफसफाई केली जाते तेव्हा तर ढीगभर कचरा, रिकाम्या बाटल्या सापडतात. आपण एक बाटली फेकली म्हणून काय फरक पडतो असा काहीसा गैरसमज करून घेऊन परिसर अस्वच्छ करण्यात हातभार लावला जातो.

कोणी सांगून, बोलून शिस्त लागत नाही. प्रत्येकाने ठरवूनच ती पाळावी लागेल. आज युनेस्कोच्या यादीत आपल्या महाराष्ट्रातील, कोकणातील वारसास्थळांचा समावेश होणं ही घटना कोकणच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करण्याजोगी आहे. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग या किल्ल्यांचा समावेश असणं कोकणच्या पर्यटन विकासात किती भर घालणार आहे, याचा विचारही कोकणवासीयांना करता येणार नाही. यापुढे कोकणात येणारा पर्यटक हा जगभरातून येणारा असेल. या आंतरराष्ट्रीय पर्यटकाला आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आपली आहे. यानिमित्ताने येणारा पर्यटक कोकणातच थांबला पाहिजे, राहिला पाहिजे. जगातून येणारा पर्यटक या पर्यटनस्थळांवर येऊन पैसे खर्च करण्याच्या मानसिकतेत असेल; परंतु येणाऱ्या पर्यटकांची मानसिकता जाणून त्याप्रमाणे त्यांना आनंदी वातावरण निर्माण करणे आणि पर्यटक आनंदी कसा राहील हे पाहण्याची जबाबदारी आपलीच असणार आहे.

अनेक संस्था, व्यक्ती, केंद्र, राज्य सरकार या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे मोठे फलित आहे. कोकणातील ही वारसास्थळे पर्यटकांचा मोठा ओघ वाढवणारी आहेत. कोकणासाठी भाग्याची ही बाब आहे. महाराष्ट्राला जशी ती अभिमानास्पद आहे त्याचप्रमाणे कोकणालाही ही बाब मान उंचावणारी आहे. आपणाकडे वारसा जतन केलेला होताच यानिमित्ताने तो जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त झाला आहे. युनेस्कोने त्यावर मोहोर उठवली. युनेस्कोच्या यादीत वारसास्थळांचा समावेश झाला हे आपण जपले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथा आणि छत्रपतींच्या पराक्रमाची साक्ष ठरणारे हे गडकिल्ले विश्वव्यापी झाले आहेत. आपल्या महाराजांच्या पराक्रमांच्या यशोगाथा ऐकताना निश्चितपणाने अंगावर रोमांच उभे राहतात. आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन, दूरदृष्टी प्रत्येक बाबतीतले बारकावे या सर्वांबद्दलची माहिती आता या पुढच्या काळात जगाच्या केवळ नकाशावर असणार असे नाही, तर त्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चाही जागतिक स्तरावर होतील. छत्रपतींच्या या इतिहासाच्या कथा जगाला प्रेरणा देत राहतील. यामुळेच कोकणासाठी ही फार मोठी बाब आहे.

# तरूणाईला राहुल गांधींचे आकर्षण

**काँग्रेसचे** नेते व लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी देशात जातील तिथे तरूणांची गर्दी खेचत आहेत. देशाच्या राजकीय पटलावर काँग्रेस पक्ष हा भाजपाचा शत्रू नंबर एक आहे. निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करायचा व निवडून आलेल्या काँग्रेसच्या नेत्यांना भाजपात आणायचे अशी दुहेरी रणनिती भाजपाने अनेक वर्षे राबवली. काँग्रेस कशी कमकवुत होईल यासाठी भाजपाने सर्व उपाय योजले. गुजरात पॅटर्नचे स्वप्न दाखवून व सबका साथ सबका विकास अशी घोषणा देऊन देशभरातील मतदारांना भाजपाने आकर्षित केले. पण बारा वर्षात काँग्रेस नेस्तनाबूत झाली नाही. राहुल गांधी हे देशपातळीवर भाजपाशी एकाकी लढत आहेत. ते माघार घेत नाहीत. केंद्रीय चौकशी यंत्रणांना घाबरत नाहीत. भाजपाने त्यांची पप्पू म्हणून टिंगलटवाळी केली तरी त्यांनी मागे वळून बघितले नाही. भाजपाच्या दबावाच्या राजकारणापुढे न झुकणारा नेता अशी त्यांची प्रतिमा तयार झाली आहे. नव्या पिढीला भाषणबाजी आवडत नाही, मन की बात पेक्षा आमचे म्हणणे काय आहे ते ऐकून घेणारा त्यांना नेता पाहिजे आहे. पोकळ वायदे, भंकस आश्वासने, कळसाला पोचलेला भ्रष्टाचार, हिंद- मुस्लिम, राम मंदिर, भारत-पाकिस्तान, वंदेमातरम अशा मुद्द्यांचा राजकारणासाठी केला जाणारा वापर त्यांना पसंत नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे शिक्षण, गुणवत्ता, रोजगार, कौशल्य विकास, नोकरी, शिक्षण संस्थांमधील सुविधा, साधन सामुग्री या मुलभूत मुद्यांवर राजकारणात कोणाला रस नाही. आम्हाला समजावून घेणारे नेतृत्व नाही. आमचे प्रश्न, आमच्या समस्या, आमच्या भावना, आमचे भविष्य यावर कुणाला विचार करायला वेळ नाही अशी जेन झीची भावना झाली आहे. म्हणूनच मोठ्या आशेने छात्रों की गुंज या कार्यक्रमाकडे तरूणाईचे लोंढेच्या लोंढे आकर्षित होत आहेत. पुण्यातील कार्यक्रमात जवळपास पंचवीस ते तीस हजार महाविद्यालयीन विद्यार्थिनी केवळ राहुल गांधींसाठी मोठ्या उत्साहाने आल्या होत्या. पुण्यात




झालेल्या कार्यक्रमात कुठेही काँग्रेस पक्षाचा झेंडा, काँग्रेस पक्षाच्या नावाचा फलक, पक्षाचे चिन्ह असलेला पंजा कुठेही नव्हता. पाच तासाच्या कार्यक्रमात कोणीही काँग्रेस असा शब्दही उच्चारला नाही. विद्यार्थिनींचे मनोगत ऐकून घेणारा कार्यक्रम होता. राजकीय पक्षांच्या कार्यक्रमात पक्षाचे नेते संवाद साधतील असे म्हटले जाते, प्रत्यक्षात हेच नेते उशीराने येतात व भाषणबाजी करून निघून जातात.

पण राहुल गांधींनी छात्रो की गुंजच्या निमित्ताने कार्यक्रमाचे स्वरूपच बदलून टाकले. पत्रकार परिषद असो किंवा विद्यार्थी संवाद, व्यासपीठावर ते एकटेच हातात माईक घेऊन फिरत असतात, ज्यांच्याशी संवाद साधायचा त्यांना मंचावर बोलवले जाते व त्यांना त्यांची भूमिका मांडण्याची संधी देतात. तो किंवा ती बोलत असताना राहुल गांधी त्यांना मधेच अडवत नाहीत, त्यांना त्यांचे म्हणणे पूर्ण मांडू देतात. त्यामुळेच आमचे म्हणणे ऐकून घेणारा देशातील पहिला नेता अशी विद्यार्थी- विद्यार्थिनींची भावना राहुल गांधींविषयी निर्माण झाली आहे.

राहुल गांधींना छात्रों की गुंज कार्यक्रमाला तरूणाईचा मिळणाऱ्या अभूतपूर्व प्रतिसादाकडे भाजपा दुर्लतक्ष करू शकत नाही. अगोदर दिल्लीत जंतरमंतरवर झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनापुढे सरकारला माघार घ्यावी लागली होतीच. धर्मेंद्र प्रधान यांना केंद्रीयमंत्री पदाचा राजीनामा देणे भाग पडले होते. देशभर जेन झी रस्त्यावर उतरल्याने सरकारला त्याचे गांभीर्य समजले.

प्रत्येक मंत्र्याने विद्यापीठ - शिक्षण संस्थेत जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधावा, अशा सुचना पंतप्रधानांना द्याव्या लागल्या. ते स्वत: इंस्टाग्रामवरून पोस्ट करू लागले आहेत. आता मात्र राहुल गांधींच्या छात्रों की गुंजला कोटा, डेहराडून, प्रयागराज, नंतर पुण्यात रेकॉर्ड ब्रेक प्रतिसाद मिळाल्याने भाजपाची सारी यंत्रणा राहुल गांधींवर हल्ला बोल करण्यात गुंतली आहे. राहुल गांधी बोलतात, ते आम्ही गांभीर्याने घेत नसतो असे सांगणारे नेते गेले चार दिवस छात्रों की गुंजवर टीकेचा भडिमार करीत आहेत. राहुल गांधींच्या पुण्यातील कार्यक्रमाला फारसा प्रतिसाद मिळू नये, गर्दी होऊ नये, म्हणून पोलीस - प्रशासनाने खूप बंधने टाकली. कार्यक्रमाला परवानगी देताना जवळपास ३५ अटी घातल्या होत्या. प्रक्षोभक भाषणे करायची नाहीत, असे बजावले होते. नारळी पौर्णिमा व इदचे कारण दाखवून पोलिसांनी जमावबंदीचा आदेश जारी केला होता. पुण्यातला राहुल यांचा कार्यक्रम हा इव्हेंट म'नेज होता व पैसे वाटप करून गर्दी जमवली होती असे भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी जाहीरपणे म्हटले. पैसे वाटप झाल्याची चौकशी करण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी तत्काळ जाहिरही केले. हा कार्यक्रम प्रमुख्याने महाविद्यालयीन मुलींसाठी होता. काँग्रेस नेत्यांच्या मालकीची कॉलेजेस आहेत तिथे मुलींना कार्यक्रमाला जाण्यासाठी सक्ती जात आहे असा प्रचार केला गेला. मुलींच्या वसतीगृहावर जाऊन त्यांना खोलीत कोंडून ठेवण्याच्याही बातम्या झळकल्या. काही मुलींना धमक्या देऊन मी तिकडे जाणार नाही, मी माफी मागते असे व्हिडिओ व्हायरल झाले.

एवढेच नव्हे तर त्यात बोलणारी मुलगी घाबरून , मला आणखी काय बोलायचे आहे: असे विचारते आहे, असेही जगाला दिसले. गर्दी जमावी म्हणून विद्यार्थिनींना तीस ते पस्तीस हजार रूपये दिले असा आरोप भाजपाने केला. तरीही तीस हजार मुली स्वत:हून आनंदाने राहुल गांधींसाठी छात्रों की गुंजमधे सहभागी झाल्या हे सर्व आश्चर्यकारक होते.

कार्यक्रमाला आलेल्या मुलींना तुम्हाला किती पैसे मिळाले, असा प्रश्न अनेकांनी अनेकांनी विचारला. पण आम्ही स्वत:हून तिकीट काढून आलोत, एक रूपयाही कोणी दिलेला नाही, असे ठणाकावून विद्यार्थिनी सांगत होत्या.

छात्रों की गुंज हा पेड इव्हेंट असेल तर लाडकी बहिण योजना काय होती ? असा प्रश्न उबाठा सेनेचे खासदार संजय राऊत यांनी विचारला आहे. राहुल गांधींबाबत विश्वास व आपलेपणा वाटतो अशा प्रतिक्रिया अनेक विद्यार्थिनींना बिनधास्तपणे कार्यक्रमाच्या ठिकाणी व्यक्त केली.

माझ्या अंगात सकाळपासून ताप आहे, मांजरीत आदिवासी मुले गेल्या बारा दिवसांपासून उपोषणाला बसली आहेत, आम्ही आदिवासी विकास मंत्र्यांना भेटलो तर ते म्हणतात, सॉरी, मी काही करू शकत नाही, सर्व काही मुख्यमंत्र्यांच्या हातात आहे: असे एका आदिवासी तरूणीने सांगताच राहुल म्हणाले, तुम्ही मला उपोषणासाठी का नाही बोलवत, मी येईन:

एका तरूण मुलीने तर मी तुम्हाला मिठी मारू शकते का ? असा प्रश्न विचारला. राहूल यांनी होकार देताच, हजारोंच्या साक्षीने त्या मुलीने राहुल यांना मिठी मारली. हे अलिंगन हे विश्वासाचे प्रतिक होते:

मनुस्मृतिच्या मानसिकतेतून बाहेर पडा असा सल्ला राहुल यांनी विद्यार्थिनींना दिला. पण त्यावरून राहुल यांच्यावर भाजपा परिवाराने सोशल मिडियावर जोरदार हल्ला चढवला. हा सल्ला केवळ हिंदु महिलापुरताच मर्यादीत आहे का ? असा प्रश्न त्याना विचारण्यात आला. पुण्याबद्दल काय सांगाल असे रहुल यांना शेवटी विचारले तेव्हा ते चक्क मराठीत म्हणाले- पुणे म्हणजे प्रेम: या तीन शब्दांनी त्यांनी तरूणाईची मने जिंकली.

गेली बारा वर्षे पंतप्रधान नरेंद्र मोदी देश- विदेशात जिथे जातात त्या कार्यक्रमात मोदी- मोदी अशा घोषणांचा निनाद घुमतो. पुण्याच्या छात्रों की गुंजमधे जेन झीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या हजारो विद्यार्थिनींनी राहुल- राहुल.. अशा घोषणांचा दीर्घ काळ केलेला गजर ही भाजपाला इशारा घंटा तर नाही ना ?..

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# राखीच्या धाग्यापलीकडचे बहिण-भावाचे नाते

रक्षाबंधन हा बहिण-भावाच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा, विश्वास आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस आहे. यंदा २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन साजरे होत आहे. या दिवसाकडे धार्मिक परंपरा किंवा कर्मकांडाच्या चौकटीतून न पाहता, मानवी नात्यांच्या भावविश्वातून पाहिले तर त्याचे महत्त्व अधिक व्यापकपणे जाणवते. बहिण आणि भाऊ हे नाते जन्मतः मिळते; परंतु त्यातील प्रेम, विश्वास आणि आपलेपणा आयुष्यभर जपावा लागतो. बालपणीच्या निरागस आठवणींपासून ते प्रौढ आयुष्यातील जबाबदाऱ्यांपर्यंत हे नाते अनेक अनुभवांतून समृद्ध होत जाते. कधी त्यात खोडकरपणा असतो, कधी भांडणे असतात, कधी रुसवे-फुगवे असतात, तर कधी कोणत्याही शब्दांशिवाय एकमेकांना समजून घेणारी विलक्षण जवळीक असते. म्हणूनच बहिण-भावाचे नाते हे केवळ रक्तसंबंध नसून भावनिक सोबतीचे आणि आयुष्यभर टिकणाऱ्या विश्वासाचे नाते आहे.

बहिण-भावाच्या नात्याची सुरुवात बहुतेकदा बालपणाच्या अंगणात होते. एकाच घरात वाढताना दोघांच्या आयुष्यातील असंख्य क्षण एकमेकांशी जोडलेले असतात. खेळताना झालेले भांडण, खाऊसाठी केलेली धावपळ, शाळेत जाण्याची लगबग, गृहपाठ टाळण्यासाठी केलेली कारणे, पालकांकडून मिळालेली कौतुकाची थाप आणि कधी झालेली रागाची बोलणी या सर्व आठवणी भावंडांच्या मनात साठत जातात. बालपणी एखादी छोटीशी वस्तू मिळाली नाही म्हणून झालेले भांडण त्या क्षणी मोठे वाटते; परंतु काही वेळाने तेच दोघे पुन्हा एकत्र खेळू लागतात. या छोट्या घटनांमधून नात्याचा एक महत्त्वाचा गुण दिसून येतो. मनात राग असला तरी मनात दुरावा कायम राहत नाही. बालपणातील हे सहज प्रेम पुढे आयुष्याच्या अनेक वळणांवर भावंडांना एकमेकांशी जोडून ठेवते.

बहिण-भावाच्या नात्यातील सर्वांत सुंदर गोष्ट म्हणजे त्यातील सहजता. या नात्यात स्वतःला वेगळे दाखवण्याची गरज नसते. आपली चूक, आपला राग, आपले दुःख, आपला आनंद किंवा आपली चिंता मनमोकळेपणाने व्यक्त करता येते. बाहेरच्या जगात प्रत्येक व्यक्तीला आपली प्रतिमा जपावी लागते; परंतु भावंडांसमोर ती प्रतिमा बाजूला ठेवून मनातील खरी भावना व्यक्त करता येते. बहीण भावाला त्याच्या चुका थेट सांगू शकते आणि भाऊही बहिणीला तिच्या निर्णयांबद्दल प्रामाणिक सल्ला देऊ शकतो. या मोकळेपणामुळे नाते अधिक घट्ट होते. अनेकदा आयुष्यातील एखाद्या कठीण प्रसंगी मित्रांपेक्षा आधी आठवण येते ती भावंडांची. कारण या नात्यात मदतीपूर्वीच विश्वास असतो.

बालपण मागे पडले की भावंडांच्या आयुष्यात बदल सुरू होतात. शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाणे, नोकरीसाठी शहर बदलणे, विवाहानंतर स्वतंत्र कुटुंब निर्माण करणे किंवा परदेशात स्थायिक होणे यामुळे एकत्र राहण्याचे दिवस संपतात. पूर्वी दररोज होणारा संवाद आता आठवड्यातून किंवा महिन्यातून एकदा होऊ शकतो. एकाच घरात वाढलेली भावंडे कधी कधी हजारो किलोमीटर अंतरावर राहू लागतात. मात्र भौगोलिक अंतर वाढले म्हणून भावनिक अंतर वाढायलाच हवे असे नाही. उलट, दूर गेल्यावर एकमेकांची आठवण अधिक तीव्र होते. बालपणीच्या आठवणी, कुटुंबातील प्रसंग आणि एकत्र घालवलेला काळ या आठवणी भावंडांना मनाने जोडून ठेवतात.

आजच्या वेगवान जीवनात प्रत्येक व्यक्ती आपल्या कामाच्या आणि वैयक्तिक जबाबदाऱ्यांच्या व्यापात अडकलेली आहे. अशा परिस्थितीत नाती जपण्यासाठी जाणीवपूर्वक वेळ देणे आवश्यक झाले आहे. बहिण-भावाच्या नात्यासाठी महागड्या भेटवस्तूंची गरज नाही. कधी अचानक केलेला दूरध्वनी, मनापासून विचारलेली विचारपूस, एखादा जुना प्रसंग आठवून केलेली गंमत किंवा संकटाच्या वेळी दिलेला धीर हे अधिक मौल्यवान असते. 'तू कसा आहेस?' किंवा 'तुला काही मदत हवी आहे का?' एवढे साधे शब्दही नात्याला आधार देतात. नात्याची किंमत भेटवस्तूच्या किमतीने ठरत नाही; ती एकमेकांना दिलेल्या वेळेने, समजून घेण्याच्या वृत्तीने आणि कठीण प्रसंगी दिलेल्या साथीने ठरते.

बहिण-भावाचे नाते आजच्या काळात समानतेच्या नव्या अर्थाने समजून घेण्याची गरज आहे. पूर्वी भावाची भूमिका केवळ बहिणीचे संरक्षण करणारा अशी मांडली जात असे. आज मात्र या नात्याचा अर्थ त्यापेक्षा व्यापक झाला आहे. बहीणही भावाच्या आयुष्यात तितकीच आधार देणारी व्यक्ती असते. भावाला अडचण आली तर बहीण त्याच्या पाठीशी उभी राहते आणि बहिणीसमोर संकट आले तर भाऊ तिच्यासोबत राहतो. ही साथ एकतर्फी नसून परस्परांची असली पाहिजे. प्रेमामध्ये अधिकार असू शकतो; परंतु नियंत्रण नसावे. काळजी असावी; परंतु बंधने नसावीत. सल्ला असावा; परंतु निर्णय लादण्याची वृत्ती नसावी. या समतोलातूनच आधुनिक बहिण-भावाचे नाते अधिक परिपक्व होऊ शकते. विशेषतः बहिणीच्या शिक्षण, करिअर आणि स्वावलंबनाच्या वाटचालीत भावाची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. बहिणीने काय शिकावे, कोणते काम करावे, कुठे राहावे किंवा कोणते निर्णय घ्यावेत यावर अधिकार गाजवण्याऐवजी तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे ही खरी साथ आहे. तिच्या यशाचा आनंद स्वतःच्या यशासारखा मानणे आणि तिच्या अपयशाच्या वेळी तिला खंबीरपणे उभे करणे हे भावाच्या प्रेमाचे अधिक सुंदर रूप आहे. त्याचप्रमाणे भावाच्या आयुष्यातील संघर्ष, आर्थिक अडचणी, करिअरमधील चढ-उतार किंवा भावनिक ताण समजून घेऊन त्याला दोष न देता ऐकून घेणे ही बहिणीचीही महत्त्वाची भूमिका आहे. दोघांनीही एकमेकांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारले पाहिजे.

बहिण-भावाच्या नात्यात संवादाला विशेष महत्त्व आहे. अनेक गैरसमज संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. 'तो स्वतःहून समजून घेईल' किंवा 'ती माझ्या मनातील भावना ओळखेल' असे गृहीत धरल्याने कधी कधी मनात अंतर वाढते. त्याऐवजी आपल्याला काय वाटते हे स्पष्टपणे सांगणे, समोरच्याचे म्हणणे शांतपणे ऐकणे आणि मतभेद झाले तरी नाते तोडण्याऐवजी संवाद कायम ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक भावंडाची जीवनशैली, विचारसरणी आणि निर्णय घेण्याची पद्धत वेगळी असू शकते. मतभिन्नता म्हणजे नात्यातील तुटलेपणा नव्हे. परस्परांच्या वेगळेपणाचा स्वीकार करणे हेच प्रगल्भ नात्याचे लक्षण आहे.

विवाहानंतर बहिणीचे आयुष्य अनेक बाबतींत बदलते. ती नव्या कुटुंबात प्रवेश करते, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारते आणि अनेकदा वेगळ्या शहरात राहू लागते. अशा वेळी माहेरच्या भावंडांशी असलेले नाते तिच्यासाठी भावनिक आधार ठरू शकते. मात्र हा आधार तिच्या वैयक्तिक आयुष्यात अनावश्यक हस्तक्षेप करणारा नसावा. बहिणीच्या जीवनातील निर्णयांचा सन्मान करणे आणि तिच्या गरजेच्या वेळी तिच्या पाठीशी उभे राहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे विवाहित बहिणीनेही भावाच्या आयुष्यातील बदल समजून घेत त्याच्या जबाबदाऱ्यांचा आदर केला पाहिजे. नात्यातील जवळीक टिकवायची असेल तर अधिकारापेक्षा समजूतदारपणाला महत्त्व द्यावे लागते.

भावंडांच्या नात्यात कधी आर्थिक मदतीची गरजही निर्माण होते. एखाद्या भावंडाला शिक्षणासाठी, व्यवसायासाठी किंवा अन्य जीवनप्रसंगी मदत लागते. अशा वेळी शक्य असेल तेव्हा मदतीचा हात पुढे करणे ही नात्याची ताकद आहे. मात्र आर्थिक व्यवहारांमुळे प्रेमाचे मोजमाप होऊ नये. कोणाने किती खर्च केला, कोणाने किती भेट दिली किंवा कोणाने किती मदत केली याची हिशेबपत्रिका नात्यात ठेवली तर भावनिक जवळीक कमी होऊ शकते. नात्याची श्रीमंती पैशांत नसते; ती विश्वासात असते. संकटाच्या वेळी 'तू एकटा नाहीस' किंवा 'तू एकटी नाहीस' हा दिलासा अनेकदा कोणत्याही आर्थिक मदतीपेक्षा मोठा आधार ठरतो.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने भावंडांनी आपल्या नात्याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. वर्षभर व्यस्त राहिल्यानंतर या दिवशी भेटणे हा एक सुंदर योग असतो; परंतु त्यापलीकडे या दिवसाचा अर्थ अधिक मोठा आहे. एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलणे, जुन्या आठवणींना उजाळा देणे, झालेल्या गैरसमजांवर पडदा टाकणे आणि भविष्यातील आयुष्यासाठी एकमेकांना प्रोत्साहन देणे हे या दिवसाचे खरे सौंदर्य ठरू शकते. राखी हा केवळ मनगटावर बांधला जाणारा धागा नसून भावनिक नात्याची आठवण करून देणारे प्रतीक आहे. त्या धाग्याला अर्थ प्राप्त होतो तो परस्परांच्या मनात असलेल्या प्रेमामुळे.

आज डिजिटल माध्यमांमुळे दूर असलेल्या भावंडांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. व्हिडिओ संभाषण, संदेश आणि दूरध्वनी यामुळे अंतर काही प्रमाणात कमी करता येते. परंतु तंत्रज्ञान हे नात्याचा पर्याय नाही; ते नाते जपण्याचे साधन आहे. सामाजिक माध्यमांवर एकमेकांसोबतचे छायाचित्र प्रसिद्ध करणे किंवा शुभेच्छा देणे सुंदर आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्यक्ष आयुष्यात एकमेकांसाठी उपलब्ध असणे. एखाद्या भावंडाच्या यशावेळी मनापासून आनंद व्यक्त करणे आणि अपयशाच्या वेळी त्याला कमी लेखण्याऐवजी धीर देणे यामुळे नाते अधिक अर्थपूर्ण होते. सार्वजनिक प्रदर्शनापेक्षा खासगी आपुलकी अधिक मौल्यवान असते. बहिण-भावाच्या नात्यातील आठवणी हा एक वेगळाच भावनिक ठेवा असतो. घरातील जुन्या वस्तू, शाळेची छायाचित्रे, बालपणीचे खेळ, एकत्र केलेल्या सहली, पालकांनी दिलेल्या सूचना, छोट्या कारणांवरून झालेले वाद आणि नंतर झालेली मैत्री या सर्व गोष्टी काळ पुढे गेल्यानंतर अमूल्य वाटू लागतात. बालपणी ज्यांच्यासोबत वेळ घालवणे अगदी स्वाभाविक वाटत होते, त्याच क्षणांची पुढे आठवण येते. म्हणूनच भावंडांनी केवळ जुन्या आठवणी जपण्यापेक्षा नव्या आठवणीही निर्माण कराव्यात. एकत्र वेळ घालवणे, कुटुंबीयांसोबत भेटणे आणि परस्परांच्या आयुष्यात सहभागी राहणे यामुळे नाते सतत नव्याने फुलत राहते.

या नात्यात क्षमाशीलतेचे महत्त्वही मोठे आहे. भावंडे जवळची असल्यामुळे एकमेकांकडून अपेक्षाही मोठ्या असतात. त्यामुळे कधी शब्द लागतात, गैरसमज होतात किंवा मन दुखावले जाते. परंतु प्रत्येक मतभेदाला कायमचा दुरावा बनू देणे योग्य नाही. नाते टिकवण्यासाठी कधी स्वतःची चूक मान्य करावी लागते, कधी माफी मागावी लागते आणि कधी समोरच्याला माफ करावे लागते. 'मीच बरोबर' या भूमिकेपेक्षा 'आपले नाते महत्त्वाचे आहे' ही भावना अधिक मोठी असली पाहिजे. नात्यातील प्रेम टिकवण्यासाठी अहंकाराला थोडे मागे ठेवावे लागते.

बहिण-भावाचे नाते आपल्याला माणूस म्हणून अधिक संवेदनशील बनवते. दुसऱ्याची काळजी घेणे, त्याच्या भावनांचा आदर करणे, त्याच्या आनंदात सहभागी होणे आणि संकटात त्याला आधार देणे या मूल्यांची सुरुवात अनेकदा कुटुंबातील नात्यांपासूनच होते. म्हणूनच या नात्यातील प्रेम केवळ दोन व्यक्तींमध्ये मर्यादित राहत नाही; ते संपूर्ण कुटुंबाच्या वातावरणावर परिणाम करते. परस्पर सन्मान आणि समानतेवर आधारलेली भावंडे पुढे समाजातील इतर नात्यांकडेही अधिक संवेदनशीलतेने पाहू शकतात. त्यामुळे बहिण-भावाचे नाते हे केवळ वैयक्तिक नाते नसून मानवी मूल्यांची शाळाही आहे.

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधावी, भावाने बहिणीला प्रेमाने भेट द्यावी, एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात; परंतु या बाह्य कृतींपेक्षा त्या मागील भावना अधिक महत्त्वाच्या आहेत. बहिणीच्या स्वप्नांना बळ देणे, भावाच्या संघर्षांना समजून घेणे, एकमेकांच्या निर्णयांचा आदर करणे, मतभेदांमध्ये संवाद साधणे आणि गरजेच्या वेळी निःस्वार्थपणे साथ देणे हा या नात्याचा खरा उत्सव आहे. नात्याचे सौंदर्य एका दिवसापुरते मर्यादित नसते. रक्षाबंधनाचा दिवस त्या नात्याची जाणीव अधिक तीव्र करून देतो; मात्र त्यातील प्रेम वर्षभर जगले गेले पाहिजे. आजच्या काळात नात्यांमध्ये वाढणारा ताण, धावपळ आणि वैयक्तिक आयुष्याभोवती केंद्रित होत जाणारी जीवनशैली पाहता बहिण-भावाच्या नात्याची जपणूक अधिक आवश्यक आहे. भावंडे एकमेकांची स्पर्धक नसून सहप्रवासी असतात. एका भावंडाचे यश दुसऱ्याच्या अपयशाचे कारण नसते. उलट, एकमेकांच्या प्रगतीत आनंद मानणे आणि परस्परांना पुढे जाण्यास प्रोत्साहन देणे ही नात्याची खरी उंची आहे. तुलना, मत्सर आणि अहंकार यांना दूर ठेवून सहकार्य आणि आपुलकी स्वीकारली तर भावंडांचे नाते अधिक आनंददायी बनते. शेवटी, बहिण-भावाचे नाते हे आयुष्याच्या प्रवासातील एक अनमोल सोबत आहे. बालपणी एकाच घराच्या छताखाली सुरू झालेला हा प्रवास पुढे वेगवेगळ्या दिशांनी जाऊ शकतो; परंतु मनातील आपलेपणाचा धागा तुटण्याची गरज नाही. काळ बदलतो, माणसे बदलतात, परिस्थिती बदलते आणि जबाबदाऱ्या वाढतात; तरीही बालपणीचा भाऊ आणि बालपणीची बहीण मनाच्या एका कोपऱ्यात कायम जिवंत राहतात. म्हणूनच २८ ऑगस्टच्या रक्षाबंधनानिमित्त राखीच्या धाग्यापेक्षा त्या धाग्याशी जोडलेले प्रेम अधिक महत्त्वाचे मानू या. एकमेकांच्या स्वातंत्र्याचा सन्मान, स्वप्नांना प्रोत्साहन, सुख-दुःखात साथ, मनमोकळा संवाद आणि आयुष्यभराचा विश्वास या मूल्यांनी बहिण-भावाचे नाते अधिक समृद्ध करू या. कारण शेवटी राखी मनगटावर बांधली जाते; पण तिचा खरा धागा मनामध्ये जुळलेला असतो. तो धागा प्रेमाचा, आठवणींचा आणि विश्वासाचा असतोड्ढ आणि म्हणूनच तो काळाच्या कोणत्याही अंतरापेक्षा अधिक मजबूत असतो.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# नेत्रदान सामाजिक चळवळ बनवूया!

**नेत्रदान ही केवळ एक सामान्य वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवी संवेदनेचे, त्यागाचे आणि सामाजिक जबाबदारीचे एक अत्यंत उदात्त रूप आहे. आपल्या मृत्युनंतरही आपले डोळे या जगात जिवंत राहून कोणाचे तरी आयुष्य उजळवू शकतात, ही भावनाच अत्यंत समाधान देणारी आहे. भारतात दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत 'राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा' साजरा केला जातो. या पंधरवड्याचा मुख्य उद्देश लोकांमध्ये नेत्रदानाबद्दल असलेली भीती आणि गैरसमजांचे निरसन करणे आणि या चळवळीत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेणे हा असतो. या दिनानिमित्त हा लेखः**

निसर्गाने दिलेली एक अद्वितीय आणि अमूल्य देणगी म्हणजे मानवी जीवन होय. आपल्या सुंदर आणि संवेदनशील डोळ्यांमुळे या जीवनाचा खऱ्या अर्थाने आनंद घेता येतो. ऋतुचक्राचे बदलणारे विविध रंग, निसर्गाची अद्भूत जादू, सृष्टीचे विलोभनीय सौंदर्य आणि आपल्या प्रियजनांच्या चेहऱ्यावरील हास्य डोळ्यांमुळेच पाहाता येते. डोळे हे केवळ एक अवयव नसून मानवी भावना व्यक्त करण्याचे आणि बाह्य जगाशी नाते जोडणारे मुख्य माध्यम आहेत. परंतु आपण सर्वजण या निसर्गदत्त प्रकाशाचा आनंद घेत असताना नशिबाच्या किंवा वैद्यकीय कारणांमुळे अंधाराच्या सावटाखाली जगत असलेलेही अनेक लोक आहेत. ज्यांच्या आयुष्यात सूर्योदय आणि रात्रीचे चांदणे या दोन्ही गोष्टी केवळ एक न अनुभवलेली संकल्पना आहेत, त्या दृष्टिहीन बांधवांच्या अंधारमय आयुष्यात आशेचा किरण पसरवण्याचा आणि त्यांना पुन्हा हे जग स्वतःच्या डोळ्यानी 'याची देही, याची डोळा' पाहण्याची संधी देण्याचा सर्वोत्तम व पवित्र मार्ग म्हणजेच 'नेत्रदान' हा होय.

**२५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत 'राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा'**

आपल्या देशात कॉर्नियल अंधत्व म्हणजेच डोळ्यातील पारदर्शक पटलाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या प्रचंड मोठी आहे. डोळ्यातील पारदर्शक पटलाला (कॉर्निया) कोणत्याही प्रकारची इजा झाल्यामुळे, संसर्ग झाल्यामुळे किंवा कुपोषण व जन्मापासूनच्या दोषांमुळे दृष्टी गमावलेल्या लोकांना 'कॉर्निया प्रत्यारोपण' या सोप्या शस्त्रक्रियेद्वारे पुन्हा दृष्टी मिळवता येते. दुर्दैवाने, भारतात नेत्रदानाची गरज आणि प्रत्यक्षात उपलब्ध होणारे कॉर्निया यांमध्ये एक खूप मोठी तफावत आहे.

दरवर्षी देशात लाखांहून अधिक कॉर्नियाची गरज भासते, परंतु प्रत्यक्षात केवळ काही हजार नेत्रदानेच पार पडतात. या दरीमुळे हजारो दृष्टिहीन व्यक्तींना, ज्यांमध्ये लहान मुलांचा आणि तरुण वर्गाचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे, आयुष्यभर अंधारात राहावे लागते किंवा वर्षानुवर्षे दात्याच्या प्रतीक्षेत राहावे लागते. मृत्यू ही निसर्गाची अटळ घटना आहे. परंतु मृत्यूनंतर आपले हे मौल्यवान अवयव मातीत मिसळून जाण्याऐवजी किंवा अग्नीत भस्म होण्याऐवजी जर कोणाचे निरस आयुष्य प्रकाशमान करत असतील, तर त्याहून मोठे पुण्य कार्य किंवा जिवंतपणाचे लक्षण दुसरे कोणतेही असू शकत नाही. समाजात नेत्रदानाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असण्यामागे वैद्यकीय सुविधांची कमतरता हे कारण नसून, जनजागृतीचा अभाव आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेले गैरसमज हेच मुख्य कारण आहे. अनेक लोकांना अशी भीती वाटते की नेत्रदान केल्यामुळे मृतदेह विद्रुप दिसेल किंवा अंत्यसंस्कारास विलंब होईल. परंतु हे पूर्णपणे वास्तवविरोधी आहे. नेत्रदानाची प्रक्रिया अतिशय वैज्ञानिक, सुटसुटीत आणि सन्मानपूर्वक केली जाते. प्रशिक्षित डॉक्टरांची तज्ज्ञ टीम मृतदेहाच्या ठिकाणी येऊन अवघ्या १५ ते २० मिनिटांत ही प्रक्रिया पूर्ण करते. यामध्ये डोळ्यातील केवळ आवश्यक असा कॉर्नियाचा भागच काढला जातो आणि त्या जागी कृत्रिम पटल किंवा कापूस ठेवून पापण्या अत्यंत काळजीपूर्वक बंद केल्या जातात. त्यामुळे चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचा डाग किंवा विद्रुपपणा येत नाही. याशिवाय, पुढील जन्मात व्यक्ती अंध जन्माला येईल असा अंधश्रद्धेवर आधारित विचारही समाजातील काही घटकांमध्ये दिसून येतो. वैद्यकीय आणि अध्यात्मिक दोन्ही दृष्टिकोनातून हा विचार पूर्णपणे फोल आहे; उलटपक्षी, मृत्यूनंतर अवयवदान करून दुसऱ्याचे आयुष्य उजळवणे हा सर्वात मोठा धर्म मानला गेला आहे. नेत्रदान ही अत्यंत संवेदनशील आणि वेळेवर आधारित असलेली प्रक्रिया आहे, म्हणूनच यामध्ये वेळेचे नियोजन सर्वात महत्त्वाचे ठरते. व्यक्तीच्या मृत्युनंतर साधारणपणे चार ते सहा तासांच्या आत नेत्रदान होणे अनिवार्य असते. जितक्या लवकर कॉर्निया काढला जाईल, तितकी त्याची गुणवत्ता उत्तम राहते आणि शस्त्रक्रिया यशस्वी होण्याची शक्यता वाढते. मृत्युनंतर नातेवाईकांनी तत्काळ जवळची नेत्रपेढी किंवा रुग्णालयाशी संपर्क साधणे आवश्यक असते. डॉक्टर येईपर्यंत मृत व्यक्तीचे डोळे उघडे राहू नयेत म्हणून त्यावर ओल्या कापसाच्या पट्ट्या ठेवाव्यात, पंखा बंद ठेवावा आणि डोक्याखाली उशी ठेवून डोके थोडे उंच ठेवावे, जेणेकरून डोळ्यांमधील रक्तप्रवाह नियंत्रित राहतो.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, मृत व्यक्तीने आपल्या हयातीत नेत्रदानाचा संकल्प केला असो वा नसो, मृत्युनंतर त्याच्या निकटवर्तीयांची संमती ही कायदेशीर आणि नैतिकदृष्ट्या अनिवार्य असते. अनेकदा व्यक्ती हयातीत फॉर्म भरते, परंतु मृत्यूच्या वेळी कुटुंबातील सदस्यांना याबद्दल माहिती नसल्यामुळे किंवा ऐनवेळी घेतलेल्या भावनावश निर्णयामुळे नेत्रदान राहून जाते. म्हणूनच, जर आपण नेत्रदानाचा संकल्प करत असू, तर त्याची स्पष्ट कल्पना आपल्या कुटुंबातील सदस्यांना देणे आणि त्यांना या निर्णयामध्ये सहभागी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. शेवटी, नेत्रदान ही केवळ काही डॉक्टरांची किंवा शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून ती एक व्यापक सामाजिक चळवळ बनली पाहिजे. आपण आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग, जसे की वाढदिवस, लग्नाचे वाढदिवस किंवा प्रियजनांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नेत्रदानाचा संकल्प करून समाजापुढे एक नवा आदर्श ठेवू शकतो. रक्तदान हे जसे श्रेष्ठदान मानले जाते, तसेच नेत्रदान हे महादान आहे. आपण या जगात नसतानाही आपल्या डोळ्यांच्या माध्यमातून हे जग पाहू शकतो आणि कोणाच्या तरी अंधारमय विश्वात कायमचा प्रकाश पसरवू शकतो. नेत्रदान पंधरवड्याच्या निमित्ताने आपण सर्वजण एकत्र येऊ या, अंधश्रद्धा व गैरसमज बाजूला सारूया, नेत्रदानाचा संकल्प करू या आणि इतरांनाही या महान कार्यासाठी प्रेरित करू या.

**– अतुल पांडे,**
सहायक संचालक (माहिती)

# श्री. शुक्लेश्वर महादेव मंदिर संस्थानच्या जमिनीच्या कथित बेकायदेशीर व्यवहाराविरोधात ९ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषण

## सर्व हिंदू संघटनांनी या घटनेचा निषेध करत मंदिरात महाआरती केली

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) – फाजलपुरा येथील श्री. शुक्लेश्वर महादेव मंदिर संस्थानच्या जमिनीच्या कथित बेकायदेशीर व्यवहाराची श्री. शुक्लेश्वर महादेव मंदिर संस्थानच्या जमिनीच्या कथित बेकायदेशीर व्यवहाराविरोधात ९ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषण. संबंधित दुय्यम निबंधक यांची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत, तसेच कथित गैरप्रकारात सहभागी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी ९ सप्टेंबर २०२६ पासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्या वतीने सतीष जगन्नाथ नरवडे यांनी दिली आहे. नरवडे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, श्री. शुक्लेश्वर महादेव मंदिर संस्थानच्या जमिनीच्या कोट्यवधी रुपयांच्या कथित बेकायदेशीर व्यवहारासंदर्भात संघटनेच्या वतीने वारंवार तक्रारी करून पाठपुरावा करण्यात आला आहे.




फाजलपुरा, छत्रपती संभाजीनगर येथील देवस्थानाची जमीन धर्मादाय आयुक्त कार्यालयाची आवश्यक परवानगी न घेता विक्री करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

या व्यवहारात खुलताबाद येथील सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग–२ अशोक इंगोले तसेच छत्रपती संभाजीनगर शहरातील कार्यालय क्रमांक १ येथील सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग–२ दीपक जाधव यांनी आपल्या शासकीय पदाचा कथित गैरवापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आर्थिक स्वार्थासाठी व्यावसायिक व देवस्थानाशी संबंधित काही व्यक्तींशी संगनमत करून देवस्थानाच्या जमिनीचे बेकायदेशीर दस्त नोंदणी केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

देवस्थानाच्या संबंधित जमिनीची नोंद धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे असतानाही आवश्यक परवानगी न घेता दस्त नोंदणी करण्यात आल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. दस्त नोंदणी करताना संबंधित नियमांचे पालन करण्यात आले नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. या प्रकरणात जमीन व्यवहारातील लिहून देणारे व लिहून घेणारे यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, तसेच संबंधित अधिकारी अशोक इंगोले व दीपक जाधव यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करून त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांसाठी ९ सप्टेंबर २०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर संघटनेच्या वतीने बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचे सतीष जगन्नाथ नरवडे यांनी सांगितले. हे उपोषण लोकशाही मार्गाने करण्यात येणार असून, उपोषणादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासन व संबंधित कार्यालयाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# हर्सूल भागातील भोगवटा-२ जमिनीच्या कथित नियमबाह्य दस्त नोंदणीप्रकरणी बेमुदत उपोषण

छत्रपती संभाजीनगर : हर्सूल भागातील भोगवटा–२ जमिनीची कथितरीत्या नियमबाह्य दस्त नोंदणी करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविण्यात आल्याच्या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी संघटनेच्या वतीने ९ सप्टेंबर २०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे.

संघटनेच्या तक्रारीनुसार, नोंदणी कार्यालय क्रमांक २ मधील सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग–२ अधिकारी आर. पी. राठोड यांनी आपल्या शासकीय पदाचा कथित गैरवापर करून काही एजंटांशी संगनमत केले. हर्सूल भागातील भोगवटा–२ जमिनीचे सक्षम अधिकाऱ्यांची आवश्यक परवानगी न घेता नियमबाह्य दस्त नोंदणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणाबाबत वारंवार तक्रारी करण्यात आल्यानंतर ८ मे २०२६ रोजी तीन सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. आठ दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही चौकशीबाबत स्पष्ट माहिती मिळाली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. ४ जून २०२६ रोजीच्या पत्रानुसार चौकशी अहवाल वरिष्ठ कार्यालयात सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, या प्रकरणात पुढील कार्यवाहीबाबत स्पष्टता नसल्याने संघटनेने बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत लोकशाही मार्गाने उपोषण सुरू ठेवण्यात येईल, असे निवेदनात म्हटले आहे.

# हिमालयात लपलेत २४३१ 'धोक्याची सरोवरे'; फुटली तर माजू शकतो महापूर

नवी दिल्ली, दि. २९ (वृत्तसंस्था) – हिमालयातील हिमनद्या वेगाने मागे सरकत असताना त्यातून निर्माण होणाऱ्या हिमनदीय सरोवरांच्या वाढत्या आकारामुळे भविष्यातील पुरांचा धोका वाढत असल्याचे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (ISRO) उपग्रह अभ्यासातून समोर आले आहे. १९८४ ते २०२३ या कालावधीतील उपग्रह प्रतिमांच्या अभ्यासानुसार, २०१६–१७ मध्ये ओळखल्या गेलेल्या १० हेक्टरपेक्षा मोठ्या २,४३१ हिमनदीय सरोवरांपैकी ६७६ सरोवरांचा आकार लक्षणीयरीत्या वाढला आहे. यातील ६०१ सरोवरांचा आकार दुपटीपेक्षा अधिक वाढला, तर १० सरोवरांचा आकार दीड ते दोन पट आणि ६५ सरोवरांचा आकार सुमारे दीड पट वाढल्याचं IS>R>Oने नमूद केलं आहे. वाढलेल्या ६७६ सरोवरांपैकी १३० सरोवरे भारतात आहेत. यातील ६५ सिंधू, ७ गंगा आणि ५८ ब्रह्मपुत्रा नदीखोऱ्यात आहेत.



**सरोवर फुटल्यास काय होऊ शकतं? –** हिमनदीच्या वितळण्यामुळे तयार झालेल्या सरोवरांना नैसर्गिक बंधारे असतात. हे बंधारे बर्फ, माती, दगड किंवा हिमनदीने मागे सोडलेल्या मोरेनपासून तयार झालेले असू शकतात. भूस्खलन, हिमस्खलन, अतिवृष्टी किंवा इतर कारणांमुळे हे नैसर्गिक बंधारे तुटल्यास सरोवरातील मोठ्या प्रमाणातील पाणी अचानक खाली येऊ शकतं. याला Glacial Lake Outburst Flood म्हणजेच GLOF म्हटलं जातं. अशा पुराचा वेग आणि त्यासोबत वाहून येणारा गाळ, दगड–माती यामुळे नदीखोऱ्यातील पायाभूत सुविधा आणि वस्तीला मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

**२०२३मध्ये सिक्कीममध्ये काय घडलं? –** याचा धक्कादायक अनुभव ऑक्टोबर २०२३मध्ये सिक्कीमला आला. उत्तर सिक्कीममधील South Lhonak Lake फुटल्यानंतर तीस्ता नदीच्या खोऱ्यात मोठ्या प्रमाणात पूर आला. खडठजच्या उपग्रह निरीक्षणानुसार, २८ सप्टेंबर २०२३ रोजी या सरोवराचं क्षेत्रफळ सुमारे १६७.४ हेक्टर होतं. ४ ऑक्टोबरला GLOFनंतर ते सुमारे ६०.३ हेक्टर राहिलं. म्हणजे जवळपास १०५ हेक्टर क्षेत्रातील पाणी बाहेर पडलं, ज्यामुळे downstream भागात अचानक पूर निर्माण होण्यास हातभार लागला. या घटनेनंतर हिमालयातील इतर हिमनदीय सरोवरांकडेही अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

**सर्व सरोवरे धोकादायक आहेत का? –** मात्र येथे एक महत्त्वाची गोष्ट समजून घेणं आवश्यक आहे. २,४३१ सरोवरे म्हणजे २,४३१ संभाव्य 'टाइम बॉम्ब' आहेत, असा अर्थ नाही. ISROच्या अभ्यासात या सरोवरांचा आकार आणि त्यातील बदल नोंदवण्यात आला आहे; प्रत्येक सरोवराला तातडीने GLOFचा धोका आहे, असा निष्कर्ष काढलेला नाही. धोका निश्चित करण्यासाठी सरोवराचा आकार, पाण्याची वाढ, नैसर्गिक बंधाऱ्याची रचना, परिसरातील भूस्खलन किंवा हिमस्खलनाची शक्यता आणि खालील भागातील लोकवस्ती यांसारख्या अनेक घटकांचा अभ्यास करावा लागतो. खडठजच्या अभ्यासात वाढलेल्या ६७६ सरोवरांपैकी ३०७ मोरेन–डॅम्ड, २६५ erosion-related, 8 ice-dammed आणि ९६ इतर प्रकारची असल्याचं समोर आलं आहे. त्यापैकी ३१४ सरोवरे ४,००० ते ५,००० मीटर उंचीवर, तर २९६ सरोवरे ५,००० मीटरपेक्षा जास्त उंचीवर आहेत.

**उपग्रहांमुळे धोका ओळखणं शक्य**

हिमालयाचा दुर्गम आणि खडतर भूभाग पाहता प्रत्येक सरोवरापर्यंत प्रत्यक्ष पोहोचून सातत्याने निरीक्षण करणं कठीण आहे. त्यामुळे उपग्रह रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञान महत्त्वाचं ठरतं. दीर्घकाळातील उपग्रह प्रतिमांमधून सरोवराचा आकार, त्याचा विस्तार आणि परिसरातील बदलांचा अभ्यास करता येतो. मात्र केवळ उपग्रह निरीक्षण पुरेसं नाही. धोकादायक मानल्या जाणाऱ्या सरोवरांच्या नैसर्गिक बंधाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी, पाण्याची पातळी आणि आसपासच्या भूभागातील बदलांचं निरीक्षणही आवश्यक आहे.

हिमालयातील हिमनदीय सरोवरांचा वाढता विस्तार हा तातडीने घाबरण्याचा विषय नसला, तरी सतत निरीक्षण, वैज्ञानिक मूल्यांकन आणि प्रभावी पूर्वसूचना व्यवस्था ही भविष्यातील GLOF चा धोका कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. २०२३च्या South Lhonak घटनेने याचं गांभीर्य आधीच दाखवून दिलं आहे.

### अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीची मराठवाडास्तरीय बैठक संपन्न

# कलावंतांच्या न्याय हक्कासाठी एकजुटीचा निर्धार

## वृद्ध कलावंतांच्या मानधनासाठी लाभार्थी संख्या वाढवण्याची मागणी

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) – अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीची मराठवाडा स्तरीय बैठक शासकीय सुभेदारी विश्रामगृह येथे समितीचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष गायक सोमनाथ गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. या बैठकीत मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील कलावंतांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलावंत मानधन योजनेपासून अनेक पात्र कलावंत वंचित राहत असल्याबाबत बैठकीत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली.



मराठवाड्यातील अनेक कलावंत वृद्ध झाले असूनही त्यांना अद्याप मानधन योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांना आर्थिक, कौटुंबिक तसेच मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. पात्र कलावंतांना वेळेत मानधन मिळावे आणि योग्य व गरजू कलावंत या योजनेपासून दूर राहू नयेत, यासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

बैठकीत कलावंतांना भेडसावणाऱ्या प्रवासातील समस्यांवरही चर्चा करण्यात आली. कीर्तन, भजन व इतर सांस्कृतिक कार्यक्रम संपल्यानंतर अनेक कलावंतांना रात्री उशिरा घरी परतावे लागते. अशावेळी प्रवासादरम्यान काही ठिकाणी पोलिसांकडून त्यांची वाहने अडविली जातात. त्यामुळे भजनी कलाकार, कीर्तनकार व वादकांना विनाकारण त्रासाला सामोरे जावे लागते. अशा प्रकारची अडवणूक होऊ नये, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर संघटनेच्या कलावंतांना ओळखपत्र देण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष सोमनाथ गायकवाड यांनी दिली.

कलावंतांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच त्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी लवकरच भव्य कलाकार मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या मेळाव्याच्या आयोजनासंदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा करून उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. कलाकार मेळाव्याच्या माध्यमातून कलावंतांच्या सविस्तर मागण्या मांडून उपस्थित मंत्री महोदयांकडे त्या मंजूर करण्यासाठी आग्रह धरण्यात येणार असल्याचा समितीचा मानस असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

संघटनेच्या वतीने १७ सप्टेंबर हा दिवस विशेष उपक्रमांद्वारे साजरा करण्यात येणार असून छत्रपती संभाजीनगर शहरासह खुलताबाद तालुक्यात संघटनेच्या नवीन शाखा स्थापन करण्यात येणार असल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली.

यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष तथा लेखक सुभाष पवार गणोरकर यांनी बोलताना सांगितले की, जिल्ह्यातून सध्या केवळ १०० कलावंतांची मानधनासाठी निवड केली जाते. ही संख्या अत्यंत तोकडी असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात वृद्ध व गरजू कलावंत मानधनापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे दरवर्षी जिल्ह्यातून किमान ५०० कलावंतांची मानधनासाठी निवड करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच मानधन योजनेसाठी असलेली उत्पन्न मर्यादा रद्द करावी अथवा त्यात वाढ करावी, अशी मागणीही त्यांनी केली. मानधनासाठी अर्ज केलेल्या कलावंतांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात यावी. वयोमर्यादेची अट कमी करून वयानुसार कलावंतांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा आणि मानधनासाठी पारदर्शक पद्धतीने निवड प्रक्रिया राबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. संघटनेशी संबंधित पात्र कलावंतांना प्राधान्य देण्यात यावे, अशीही मागणी बैठकीत मांडण्यात आली.

या प्रसंगी संपर्कप्रमुख बबनराव गोरे, हिम्मतराव वाघ, शिवाजी गायकवाड, संजय जाधव, संजू पवार, कीर्तनकार वाघ महाराज यांच्यासह मराठवाड्यातील बहुसंख्य कलावंत उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन हिम्मतराव वाघ यांनी केले, तर बबनराव गोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सागात अडकलेले ३७ भाविक काठमांडूकडे सुखरूप रवाना

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण करून परतीच्या प्रवासात तिबेटमधील सागा येथे महाराष्ट्रातील ३७ भाविक अडकले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तातडीच्या पुढाकारानंतर सर्व भाविक सकाळी ६ वाजता सागा येथून न्यालम चेक पोस्टमार्गे काठमांडूकडे सुखरूप रवाना झाले आहेत.

ठाणे, पुणे, अलिबाग, रायगड आणि डोंबिवली परिसरातील ३७ भाविक कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेले होते. परतीच्या प्रवासादरम्यान ते सागा येथे अडकले. त्यांचे काठमांडूहून परतीचे विमान २९ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता नियोजित असल्याने वेळेत काठमांडू गाठणे आवश्यक होते. याबाबत माहिती मिळताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्वरित भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी संपर्क साधून आवश्यक सहकार्य मिळवले आणि सर्व भाविकांचा सागा ते काठमांडू सुरक्षित परतीचा प्रवास सुरू झाला.

# रोटेगाव (द.म.रे) येथे रेल्वे प्रवाशांसाठी रेल्वे गाड्या थांबा देण्याची मागणी

वैजापूर , दि. २९ (प्रतिनिधी) – रोटेगाव (दमरे) हे वैजापूर पासून ३किमी अंतरावर आहे. वैजापूर येथून दररोज जवळपास ८०० ते १००० रेल्वे प्रवाशी पुणे, मुंबई, नांदेड, जालना, संभाजीनगर येथे जा–ये करतात. मात्र काही महत्वाच्या रेल्वे गाड्या थांबत नाहीत. त्यामुळे प्रवाशांचे खूप हाल होत आहेत. रोटेगाव हे मनमाड–संभाजीनगर रेल्वे मार्गावरील एकमेव स्टेशन सर्वात जास्त आर्थिक उत्पन्न देणारे स्थानक आहे. यामुळे रोटेगाव स्टेशन अमृत भारत योजनेत येते. हे स्थानक प्रवाशीभिमुख व्हावे त्यांना सर्व सुविधा मिळाव्यात म्हणून अत्यंत आधुनिक सुविधा या स्थानकावर प्रवाशांना मिळाव्या म्हणून कोट्यवधी रूपये सरकार खर्च करुन हे स्थानक अद्यावत करीत आहे.असे असतांना येथे खालील रेल्वे गाड्या थांबाव्या म्हणून नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांचे निवेदन शुक्रवार (ता. २८) रोजी प्रवाशी संघटना सल्लागार व सामाजिक कार्यकर्ते ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना पाठवून नांदेडचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (दमरे) तसेच रोटेगाव स्टेशन अधीक्षक यांना देऊन १) नरसापूर ते नागरसोल २) नांदेड ते पुणे एक्सप्रेस ३)जनशताब्दी एक्सप्रेस, ४) सचखंड एक्सप्रेस, ५) वंदे भारत एक्सप्रेस तसेच ५) हैदराबाद–अजमेर–हिस्सार एक्सप्रेस यांना रोटेगाव (दमरे)येथे थांबे देऊन रेल्वे प्रवाशांना सुविधा पूरवा अशी मागणी केली आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# शासन देणार उद्योजकांच्या पंखाना बळ-पालकमंत्री संजय शिरसाट

## इव्ही हब म्हणून जगात ओळख निर्माण करू- नवीनीकरण ऊर्जा मंत्री अतुल सावे

## जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत १२ हजार कोटींचे सामंजस्य करार, २१ हजार रोजगार निर्मिती

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद २०२६ मध्ये आज २३२ उद्योगांचे १२ हजार ९४४ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. त्याद्वारे २१ हजार ३०६ जणांना रोजगार उपलब्ध होतील, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत देण्यात आली.

उद्योजकांच्या पंखाना बळ देण्याचे काम शासन करेल, आपण जिद्दीने आपली वाटचाल सुरु करावी, अशा शब्दात राज्याचे सामाजिक न्याय तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी उपस्थित उद्योजकांना आश्वस्त केले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरण आहे. आता भविष्यात इलेक्ट्रिक व्हेईकल निर्मितीचे हब म्हणून जगात ओळख निर्माण करू, असा विश्वास राज्याचे इमाव बहुजन कल्याण, नवीनीकरण ऊर्जा मंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केला.

उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढावी यासाठी गुंतवणूकदार, व्यावसायिक यांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन आज करण्यात आले. ही परिषद हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे पार पडली.

जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद २०२६ च्या अध्यक्षस्थानी जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट हे होते. तसेच इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., विभागीय सह आयुक्त (उद्योग) स्वप्नील राठोड, जिल्हा उद्योग केंद्राच्या उपायुक्त श्रीमती करुणा खरात, मैत्री च्या समन्वयक श्रीमती धनश्री जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या परिषदेत १२ हजार ९४४ कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आले. यात २३२ उद्योगांचा सहभाग आहे. यामुळे २१ हजार ३०६ जणांना रोजगार उपलब्ध




होतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की,लहान पुरवठादार, उद्योजक ते मोठे उद्योग यांच्यातील साखळी मजबूत केली पाहिजे. उद्योजकांना जिद्दीने झेप घ्यायची असते त्यासाठी त्यांच्या पंखाना बळ देण्याचे काम शासन करेल. जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीत जागेची मागणी वाढली आहे. त्यात आज सामंजस्य करार केलेल्या उद्योगांना प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले.

श्री. सावे म्हणाले की, जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रात वाढती गुंतवणूक पाहता दळणवळण, वीज पुरवठा सुविधा, समन्वय केंद्र यासारख्या सुविधा उपलब्धतेचे कामे मार्गी लागले आहेत. उद्योग करणे सुलभ व्हावे यासाठी आवश्यक सुविधा देण्याचे शासनाचे धोरण आहे, असेही श्री. सावे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. म्हणाले की, उद्योगाच्या वाढी साठी शासनाच्या धोरणानुसार प्रशासन तत्परतेने कामे मार्गी लावत आहे. औद्योगिक विस्तारासाठी भुसंपादन प्रक्रिया विविध टप्प्यावर सुरु आहेत. प्रास्ताविक स्वप्नील राठोड यांनी तर सूत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले. या परिषदेस मोठ्या संख्येने उद्योजक सहभागी झाले.

# भूविज्ञान विभागाचे उपसंचालक डॉ. सुयोग जगताप यांचा घरात आढळला मृतदेह; व्हिसेरा राखून ठेवला

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- भूविज्ञान आणि खनिकर्म (गौण खनिज) विभागाचे प्रादेशिक उपसंचालक डॉ. सुयोग अनिल जगताप (वय ४१) यांचा सिडको एन-१ परिसरातील राहत्या घरी संशयास्पद स्थितीत मृतदेह आढळून आल्याने प्रशासकीय वर्तुळात तीव्र धक्का बसला आहे. शुक्रवारी (२८ ऑगस्ट) सकाळी ७ वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

डॉ. जगताप यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांचा व्हिसेरा सुरक्षित राखून ठेवला आहे. प्राथमिक तपासाच्या आधारे हा नैसर्गिक मृत्यू असावा, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. जगताप यांचे मूळ कुटुंब पुण्यात राहते, तर



संभाजीनगरमधील एन-१ येथील भाड्याच्या फ्लॅटमध्ये ते एकटेच वास्तव्यास होते. त्यांच्याकडे घरकामासाठी येणाऱ्या तरुणाने गुरुवारी फोन केला होता; मात्र डॉक्टरांनी कॉल उचलला नाही. वारंवार फोन करू नकोस अशी सक्त सूचना असल्याने तरुणाने पुन्हा संपर्क केला नाही. शुक्रवारी सकाळी ७ वाजता तो तरुण कामावर पोहोचला असता, वारंवार बेल वाजवून आणि दरवाजा ठोठावूनही आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

घाबरलेल्या तरुणाने तत्काळ एमआयडीसी सिडको पोलिसांशी संपर्क साधला. माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सचिन वायाळ यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत दरवाजा उघडला. त्यावेळी डॉ. जगताप मृतावस्थेत आढळले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

या प्रकरणी एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची (एडी) नोंद करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करत आहेत. काल सायंकाळपर्यंत हसत-खेळत वावरणाऱ्या अधिकाऱ्याचा असा अचानक मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# हळद संशोधन केंद्राची बोधचिन्ह स्पर्धा, स्पर्धेत सहभागासाठी १० सप्टेंबरपर्यंत अंतिम मुदत

हिंगोली दि.२९ (प्रतिनिधी)- हळद उत्पादन, संशोधन, प्रक्रिया उद्योग आणि शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राच्या बोधचिन्ह स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांनी केले आहे. निवड झालेल्या उत्कृष्ट बोधचिन्हास एक लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १० सप्टेंबर २०२६ पर्यंत नोंदणी करता येणार आहे. इच्छुकांनी दिलेल्या क्यूआर कोडद्वारे किंवा ई-मेलवर आपली नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी hbthratc@gmail.com या ई-मेलवर तसेच ९२८४७७४८६७, ९१६८९१२८९१ आणि ९५१८५४००५८ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे हरिद्रा केंद्राचे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप कच्छवे यांनी सांगितले.

बोधचिन्ह स्पर्धा महाराष्ट्रासह देशभरातील नागरिक, विद्यार्थी, व्यावसायिक आणि हौशी डिझायनर्ससाठी खुली आहे. संस्थेचे कार्य, उद्दिष्टे आणि हळद पिकाशी संबंधित संकल्पना साकार करणारे आकर्षक व अर्थपूर्ण बोधचिन्ह तयार करून स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी एक लाख रुपये व प्रशस्तीपत्र, तर तीन उत्तेजनार्थ पारितोषिकांसाठी प्रत्येकी ११ हजार रुपये व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. बोधचिन्ह पूर्णपणे मूळ स्वरूपाचे असावे. त्यावर कोणत्याही प्रकारचा कॉपीराइटचा दावा नसावा. लोगोची संकल्पना, डिझाइनमागील विचार व त्याचा अर्थ स्पष्ट करणारी संकल्पना टिपण सादर करणेही आवश्यक आहे.

स्पर्धकांनी उच्च दर्जाच्या पीडीएफ स्वरूपात आपले डिझाइन अधिकृत लिंक किंवा क्यूआर कोडद्वारे सादर करावे. निवड झालेल्या बोधचिन्हाचे सर्व कॉपीराइट व वापर अधिकार संस्थेकडे राहतील. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील, असेही श्री. कच्छवे म्हणाले.

# वैजापूरात आनंदऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटरचा शुभारंभ

वैजापूर दि.२९ (प्रतिनिधी)- शहर व तालुक्यात डोळ्यांच्या आजारांनी ग्रस्त असलेल्या नागरिकांसाठी डोळ्यांची तपासणी व मोती बिंदू शस्त्र क्रिया ,व ईतर आजार यावरील उपचार अत्यंत माफक शुल्कात उपलब्ध व्हावेत व डोळ्याच्या रुग्णांना सोय वैजापूरात उपलब्ध व्हावी म्हणून शहरातील न्यू सन्मित्र कॉलोनीत(बस स्थानक लगत)आनंदऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटरचा शुभारंभ सोहळा शनिवार(ता.२९)रोजी सम्पन्न झाला.




गंगापूरचे आमदार प्रशांत बंब,वैजापूरचे आमदार प्रा.रमेश पा.बोरनारे, नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उप जिल्हा वैद्यकीय अधिक्षक डॉ.अरविंद हरबडे यांनी फित सोडून या नेत्रालयाचे उद्घाटन केले. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष साबेरखान,प्रकाश शेठ बोथरा, शोभाचंद संचेती, आनंदीताई अन्नदाते, डॉ.अरविंद अन्नदाते, मेजर सुभाष संचेती, धोंडीरामसिंह राजपूत, सावनसिंह राजपूत, विशाल संचेती, हेमंत संचेती, निलेश पारख, शकुंतला संचेती, पी. जी.पवार, उमेश संचेती, रूपेश संचेती यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्तविक प्रशासकीय अधिकारी ,अहिल्यानगर आनंद छाजेड यांनी केले. सूत्र संचलन जवाहर कोठारी यांनी केले तर आभार स्वजल संचेती यांनी मानले.

## बाह्यस्रोत यंत्रचालकास मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- महावितरणच्या बाह्यस्रोत यंत्रचालकास मारहाण करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

अभिषेक पोफळे हे गाढेजळगाव उपकेंद्रात बाह्यस्रोत यंत्रचालक म्हणून दीड महिन्यांपासून काम करतात. २८ ऑगस्ट रोजी दुपारी २.४० वाजता बळीराम एकनाथ कोरडे (रा. गाढेजळगाव) उपकेंद्रात आला. माझ्या पत्नीला शेतात शॉक लागलेला आहे, तुम्ही लाईट बंद करा असे त्याने सांगितले. सहायक अभियंता सोनवणे यांना माहिती देऊन त्यांच्या आदेशाने पोफळे यांनी गाढेजळगाव ए.जी. फीडर बंद केले. संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास फीडर चालू करून वीजपुरवठा पूर्ववत केला. सायंकाळी ६.१५ वाजता बळीराम एकनाथ कोरडे व अर्जुन अंबादास गाढेकर हे उपकेंद्रात आले. तू परत लाईट का चालू केली असे म्हणत त्यांनी पोफळेंना शिवीगाळ केली तसेच तू आताच लाईट बंद कर म्हणत मारहाण केली. या प्रकरणी पोफळेंच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींवर करमाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# मुटा शिक्षक संघटनेचे जिल्हा परिषद शिक्षण विभागाविरोधात तीव्र आंदोलन!

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्या तसेच जिल्हा परिषद शिक्षण विभागात सुरू असलेल्या कथित गैरप्रकार व भ्रष्टाचाराच्या विरोधात मुटा शिक्षक संघटनेच्या वतीने मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांतील शिक्षणाधिकारी कार्यालयांसमोर तीव्र आंदोलन करण्यात आले.



प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर कार्यरत शिक्षकांचे वैद्यकीय देयके, वरिष्ठ वेतनश्रेणी, पदोन्नती तसेच इतर अनेक प्रलंबित प्रश्न दीर्घकाळापासून रखडलेले आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षकांना वारंवार संबंधित कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असून, त्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

तसेच अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शाळांमधील शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता नियमबाह्य पद्धतीने अडविण्यात आल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला. अनेक शिक्षकांची शालार्थ आयडीची प्रकरणेही जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले.या सर्व प्रलंबित प्रश्नांचा तातडीने विचार करून न्याय्य तोडगा काढावा, अन्यथा शिक्षकांच्या तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल, असा इशारा मुटा शिक्षक संघटनेच्या वतीने देण्यात आला.

## कवयित्री डॉ. सविता लोंढे यांच्या ‘खर्ची पडलीत काही स्वप्न’ कवितासंग्रहाचा सोमवारी प्रकाशन सोहळा

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- प्रसिद्ध कवयित्री डॉ. सविता लोंढे यांच्या ‘खर्ची पडलीत काही स्वप्न’ या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.हा प्रकाशन सोहळा मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवछत्रपती महाविद्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृहात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध समीक्षक तसेच मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. दादा गोरे राहणार आहेत. प्रसिद्ध साहित्यिक, लेखक, ज्येष्ठ समीक्षक आणि आंबेडकरी विचारवंत डॉ. ऋषीकेश कांबळे यांच्या हस्ते कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कार्यक्रमास शिवछत्रपती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच प्रसिद्ध कवी, समीक्षक व कादंबरीकार डॉ. सुदाम राठोड (नाशिक) आणि रमाई मासिकाच्या संपादक प्रा. डॉ. रेखा मेश्राम हे प्रमुख भाष्यकार म्हणून उपस्थित राहणार आहेत.

(पान १ वरून)

## हे शेवटचं आंदोलन, मागणीत एकही...

मराठाच नव्हे तर ओबीसी आणि एसटी प्रवर्गातील गरीब लोकांचेही कल्याण होईल, असे ते म्हणाले.

मराठा समाजाला भावनिक साद घालताना जरांगे पाटील म्हणाले, ‘‘आज प्रशासनात इतर जातींचे अधिकारी बसले आहेत, ज्यांना आपल्याबद्दल द्वेष आहे. अधिकारी हा जात विसरून सर्वांसाठी काम करणारा असावा, पण काही जणांच्या डोक्यात घाणेरडे विचार आहेत. त्यामुळे मराठा समाजाने आता शहाणे व्हावे, आरक्षण मिळवून आपली मुले प्रशासनात अधिकारी बनवा. तरच पुढच्या पिढीचे वाटोळे टळेल.‘‘

इथे कोणताच समाज सुखी नाही. मुंबईतील ना मराठी माणूस सुखी आहे, ना परप्रांतीय, मराठवाडी आणि जैनसुद्धा सुखी नाही. डी.बी. पाटलांचे नाव सुद्धा विमानतळाला द्यायला हे तयार नाहीत, यांना माज आलाय. १२ तारखेला जी तारीख ठरेल त्याची तयारी करावी. मुंबईतील मराठ्यांनी फक्त जेवण कमी पडू देऊ नये, असे म्हणत पुन्हा एकदा मुंबईला जायची तयारी सुरू असल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं.

## नेपाळ महापूर: मृतांची संख्या ६२६ वर!...

माहिती दिली आहे की, आतापर्यंत ८५ भारतीयांसह १२१ परदेशी पर्यटकांची सुटका करण्यात आली आहे. त्यात ९ दक्षिण कोरियाचे आणि १६ चीनचे नागरिक आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायसवाल यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले सुमारे ४०० भारतीय नागरिक चीनच्या (तिबेट) सीमेवर अडकले आहेत. दिलासादायक बाब म्हणजे हे सर्व भाविक पूर्णपणे सुरक्षित आहेत.

नेपाळमधील पूरग्रस्त भागातून सुटका करण्यात आलेले तमिळनाडूतील २१ नागरिक इंडिगोच्या विमानाने सुरक्षितपणे दिल्लीत पोहोचले आहेत. काठमांडूमध्ये भारतीय प्रमुखांनी (दूताने) स्वतः त्यांची भेट घेऊन विचारपूस केली होती. त्रिशूली-१ जलविद्युत प्रकल्पात अडकलेल्या ६३ भारतीय कामगारांना गुरुवारी सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. चीनच्या बाजूला अडकलेले ९६ भारतीय नागरिक जमिनीच्या मार्गाने सुरक्षितपणे नेपाळच्या सीमेत दाखल झाले आहेत. आता त्यांना मायदेशी आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. रणधीर जायसवाल यांनी सांगितले की, बेपत्ता नागरिकांची संख्या ३२० असली तरी ही आकडेवारी सतत बदलत आहे. सध्या अनेक याद्यांची पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. भारतीय वंशाचे जे १०० लोक बेपत्ता आहेत, त्यांच्याकडे इतर देशांचे नागरिकत्व असू शकते आणि ते मानसरोवर यात्रेसाठी गेले असण्याची शक्यता आहे.

या भीषण परिस्थितीचा सामना करण्यासाठी आणि नागरिकांना मदत पुरवण्यासाठी नवी दिल्लीतील परराष्ट्र मंत्रालय, काठमांडूमधील भारतीय दूतावास आणि बीजिंगमधील भारतीय दूतावास या तिन्ही ठिकाणी २४ तास कंट्रोल रूम सुरू करण्यात आल्या आहेत. भारत सरकार नेपाळला सर्व प्रकारची मदत पुरवण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

शोध व बचावकार्यामध्ये ७,४५१ सुरक्षा सैनिक सहभागी झाले आहेत. त्यामध्ये नेपाळ लष्कराच्या २,३९१ सैनिकांचा समावेश आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. त्याचवेळी भोटेकोशी नदीच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे नव्याने पूर येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## शरद पवारांकडून १० प्रवक्त्यांची...

यादीत अनुभवी नेत्यांसोबतच तरुण आणि विविध सामाजिक घटकांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली आहे. जितेंद्र आव्हाड, क्लाईड क्रास्टो, भीमराव हत्तीअंबीरे, अनिश गवांदे, ॲड. फैजल मिर्झा, महेबूब इब्राहीम शेख, प्रवीण कुंटे पाटील, प्रशांत सोनबा वीरकर, ॲड. हेमाताई पिंपळे आणि डॉ. चंद्रकांत बारेला यांचा समावेश आहे.

यापैकी जितेंद्र आव्हाड हे पक्षातील आक्रमक आणि अभ्यासू भूमिका मांडणाऱ्या नेत्यांपैकी एक मानले जातात. त्यामुळे त्यांच्याकडे पुन्हा प्रवक्तेपदाची जबाबदारी देणे हे पक्षाच्या माध्यमांमधील आक्रमक भूमिकेच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. त्याचबरोबर अनिश गवांदे, महेबूब शेख आणि हेमाताई पिंपळे यांसारख्या तुलनेने नव्या चेहऱ्यांना संधी देत पक्षाने प्रवक्त्यांच्या टीममध्ये वैविध्य आणण्याचा प्रयत्न केला आहे.

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बिगरमराठा,....

उखडून टाकू असे बरळत आहे. महत्त्वाच्या व्यक्तींच्या घरांना टार्गेट करु, ही त्याची अतिरेकी भाषा आहे. आझाद मैदानाच्या परिसरात अडीचशेपेक्षा जास्त लोक आले तरी हा परिसर डिस्टर्ब होतो, पण मराठा आंदोलनाला चाळीस हजार आंदोलक येतील. त्यामुळे पोलिसांनी गंगाधर काळकुट्टे यांचा अर्ज निकाली काढून याठिकाणी आंदोलनाला परवानगी देऊ नये, अशी मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली.

शरद पवार यांनी छातीवर हात ठेवून सांगावे की, एका वर्गाला तीन वेगळे आरक्षण मिळू शकतात का? एकीकडे ईडब्ल्यूएसचे आरक्षण मागत आहेत, पुढे ओबीसीचे मागत आहेत. मृत झालेल्या कुटुंबियांच्या व्यक्तीला नोकरी द्या म्हणत आहेत, जर मराठा समाजातील लोकांना नोकरी देत आहात तर मग ज्या ज्या कुटुंबियांत मृत्यू झाले आहेत त्या त्या कुटुंबियातील लोकांना जात-पात न पाहता नोकरी द्या, कुटुंब कोणत्याही जातीचे असले तरीही नोकरी द्यावी लागेल,‘‘ असे देखील त्यांनी म्हटले.

## नाशिकमधील कुंभमेळ्यात २५ हजार...

संताप व्यक्त करताना राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना थेट सवाल केला. ‘‘नाशिकमध्ये खड्ड्यांमुळे आतापर्यंत १२ लोकांचे बळी गेले आहेत, मात्र मुख्यमंत्र्यांना जनतेचा आक्रोश ऐकू येत नाही. मुख्यमंत्री काल हवेतून उडत गेले का? त्यांना रस्त्यावरील खड्डे दिसले नाहीत का?‘‘ असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. साधारण १० वर्षांपूर्वी हे शहर दत्तक घेतले होते, तेव्हापासूनच या शहराची दुर्गती सुरू झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांची तुलना महात्मा गांधींच्या तीन माकडांशी करत टीका केली. ते म्हणाले, ‘‘गांधींची माकडे सत्याच्या बाजूने होती. पण या मुख्यमंत्र्यांची माकडे भ्रष्टाचार पाहणार नाही, भ्रष्टाचाराविषयी ऐकणार नाही आणि त्याविषयी तक्रार केली तर बोलणार नाही अशा अवस्थेत आहेत. हे सतत खोटे बोलतात. जशी मोदींना डिग्री मिळाली आहे, तशीच आता यांनाही खोटं बोलण्यासंदर्भात एक डिग्री द्यावी लागेल.‘‘

## पुणे मनपाच्या कनिष्ठ अभियंता परीक्षेत...

हे मान्य करुन पेपरफुटीचा प्रकार घडल्याचा स्पष्ट निर्वाळा महापालिकेने दिला आहे. मात्र, तरीही महापालिका ही भरती प्रक्रिया रद्द करण्यास तयार नाही. हा गैरप्रकार केवळ ३ जणांपुरताच मर्यादित होता याची हमी महापालिका देऊ शकते का? पेपरफुटीच्या प्रकरणाचे स्वरुप आणि त्याचे धागेदोरे स्पष्ट होण्यासाठी सखोल चौकशी आवश्यक आहे. परंतु तत्पूर्वीच महापालिका निवड झालेल्या उमेदवारांना रुजू करुन घेत आहे. यामुळे इतर अनेक पात्र आणि प्रामाणिक उमेदवारांच्या कष्टावर पाणी फेरलं गेलं आहे. माझी महापालिका आयुक्तांना विनंती आहे की ही सदोष भरतीप्रक्रिया रद्द करुन संपूर्ण प्रक्रिया नव्याने पारदर्शक पद्धतीने राबविण्यात यावी'', अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

‘‘पुणे मनपा कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) भरती परीक्षेतून प्रश्नांचे फोटो बाहेर येऊनही मनपा प्रशासन जबाबदारी झटकतंय. गेल्या महिन्यात विद्यार्थ्यांनी ‘मनपा’समोर आंदोलन केलं, त्यावेळी मी स्वतः आयुक्तांची भेट घेऊन चौकशी होईपर्यंत नियुक्त्या न देण्याची विनंती केली होती. आता आयबीपीएसच्या अहवालात पुढील चौकशीची गरज असा स्पष्ट निष्कर्ष असताना, तसंच विद्यार्थ्यांच्या तीव्र विरोधानंतरही मनपा प्रशासनाला प्रसिद्धीपत्रक काढून तातडीने नियुक्ती आदेश देण्याची एवढी घाई का झाली? यामागे कुणाचा अदृश्य दबाव कार्यरत आहे का?'', असा सवाल रोहित पवार यांनी केला आहे.

## सीजेपीचे अध्यक्ष अभिजीत दिपके शाळा...

सुधारुन विद्यार्थ्यांना सुविधा द्या, असा इशारा कॉक्रोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी शनिवारी (ता. २९) शासनाला दिला.

हिंगोली तालुक्यातील लोहगाव आणि करंजाळा येथील जिल्हा परिषद शाळांना भेट देऊन दिपके यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. वर्गखोल्या, विद्यार्थ्यांची आसनव्यवस्था, पिण्याचे पाणी तसेच मध्यान्ह भोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या मसाल्यांची त्यांनी पाहणी केली. यावेळी ग्रामस्थांनी शाळेतील विविध समस्यांचा पाढाच दिपके यांच्यासमोर वाचला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि क्षमता असतानाही त्यांना आवश्यक शैक्षणिक सुविधा मिळत नसतील, तर ही केवळ शाळांची समस्या नसून शिक्षणातील सामाजिक विषमतेचा गंभीर प्रश्न आहे, असे दिपके यांनी सांगितले. एका बाजूला अधिकारी आणि लोकप्रतिनिधींची मुले अत्याधुनिक सुविधांच्या शाळांमध्ये शिक्षण घेतात, तर दुसरीकडे सर्वसामान्यांची मुले मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या, अपुरी आसनव्यवस्था आणि मूलभूत सुविधांच्या अभावात शिक्षण घेत आहेत, ही परिस्थिती दुर्दैवी असल्याची टीका त्यांनी केली.